सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १८ मार्च २०२५ वर्ष दुसरे अंक ३५१ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर सर्वांसाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी - मुख्यमंत्री फडणवीस

ठाणे : देव, देश अन् धर्मापायी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले, सर्वांसाठी दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांचे मंदिर होणे, ही अतिशय अभिमानाची बाब असून सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. येथे महाराजांच्या दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिवक्षेत्र मराडे पाडा,



ता.भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर (शक्तीपीठ) लोकार्पण संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज, प.पू. बालयोगी सदानंद बाबा, ह.भ.प डॉ.कैलास महाराज निचिते, राष्ट्रसंत नीलकंठ शिवाचार्य, प.पू. आलोकनाथ महाराज, खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, आमदार दौलत दरोडा, आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश चौघुले, शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजू चौधरी, श्री.विश्वनाथ पाटील, नरेंद्र पवार, जितेंद्र डाकी, विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस. स्वामी, श्री.अनंता भोईर, आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा देत त्यांनी कैलास निचिते व राजू चौधरी यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य मंदिराच्या संकल्पना व प्रत्यक्ष निर्माणाकरिता कौतुक केले. ते म्हणाले की, आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच आपल्या इष्ट देवतेचे मंदिरात जावून दर्शन घेवू शकतो.

# कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत सहभागासाठी संधी देणार - बावनकुळे

मुंबई : कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून या भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होण्याची संधी राज्य शासन उपलब्ध करून देत असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेमध्ये दिली.

सदस्य निरंजन डावखरे यांनी याविषयी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना महसूल मंत्री बावनकुळे बोलत होते.



यावेळी सदस्य प्रवीण दरेकर यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्र, कौशल्य विकास केंद्र उभारणार असल्याचे सांगून मंत्री बावनकुळे म्हणाले की, राज्यशासन या सर्व विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहे. त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांना लागणारे सर्व प्रशिक्षण देण्याची शासनाची भूमिका आहे. तसेच राज्यातील तलाठी भरतीमध्ये कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची संधी देण्यात आली होती. सुमारे ३९१ उमेदवारांनी तलाठी पदभरती परीक्षा २०२३ साठी अर्ज भरल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने सरकारला दिले ३९६ कोटी रुपये

अयोध्या : अयोध्येत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. प्रभू श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा झाल्यापासून अयोध्येतील मंदिराच्या कामांना वेग आला. मंदिराची निर्मिती तसेच मंदिराशी संबंधित सर्व कामांची जबाबदारी श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची अर्थात श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाची आहे. राम मंदिराचे आतापर्यंत ९६ टक्के काम पूर्ण झाले आहे. मंदिराचे राहिलेले काम पण वेगात सुरू आहे. जून २०५ पर्यंत मंदिर निर्मितीचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मंदिराशी संबंधित वेगवेगळ्या कामांसाठी म्हणून श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने सरकार दफ्तरी आतापर्यंत ३९६ कोटी रुपये जमा केले आहेत.

श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची बैठक अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला सात ट्रस्टी अर्थात विश्वस्त आणि चार विशेष आमंत्रित सदस्य उपस्थित होते. विशेष आमंत्रित म्हणून केशव पराशरण, विमलेंद्र मोहन मिश्र, युगपुरुष परमानंद, नृपेंद्र मिश्र उपस्थित होते. बैठकीत राम मंदिराच्या निर्मितीच्या प्रगतीवर चर्चा झाली. महामंत्री चंपत राय यांनी सांगितले की, ५ फेब्रुवारी २०२० रोजी श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट अर्थात श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाची स्थापना झाली. ट्रस्टच्या स्थापनेपासून ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत म्हणजेच मागील पाच वर्षात ट्रस्टच्या खात्यातून सरकारच्या विविध विभागांना ३९६ कोटी रुपये देण्यात आले. यात जीएसटी २७२ कोटी, टीडीएस ३९ कोटी, लेबर सेस १४ कोटी, ईएसआय ७.४ कोटी, विमा ४ कोटी, जन्मभूमीच्या नकाशासाठी अयोध्या विकास प्राधिकरणला ५ कोटी, अयोध्येतील जमीन खरेदीसाठी स्टँप ड्युटी अर्थात स्टँप शुल्क २९ कोटी, वीज बील १० कोटी, रॉयल्टी १४.९ कोटी रुपये यांचा समावेश आहे. दगडांची रॉयल्टी राजस्थान, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यांना देण्यात आली आहे.

# जिल्ह्यातील संभाव्य टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी सज्जता ठेवा : राधाकृष्ण विखे पाटील

अहिल्यानगर दि.१६- जिल्ह्यातील विकास कामांना गती देण्यासोबत उन्हाची वाढती तीव्रता लक्षात घेता संभाव्य टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद आणि स्थानिक क्षेत्रीय कार्यालयांनी सज्जता ठेवावी आणि समन्वयाने काम करावे. शासनाच्या १०० दिवस कार्यक्रमांतर्गत सर्व शासकीय कार्यालयात स्वच्छता अभियान राबवावे, अशा सूचना जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

मंत्री विखे पाटील यांनी अहिल्यानगर येथील पालकमंत्री कार्यालयात जनता दरबारच्या माध्यमातून नागरीकांच्या समस्या



जाणून घेतल्या. त्यांनी प्राप्त झालेल्या अर्जावर सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या तसेच जिल्ह्यातील नागरिकांच्या प्रश्नाबाबत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन संवेदनशीलतेने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

यावेळी जिल्हाधिकारी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, निवासी उप जिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, कार्यकारी अभियंता सायली पाटील, स्वप्निल काळे, वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता राजेंद्र चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, उन्हाळ्यात पाण्याचे योग्य नियोजन करावे लागेल. पाण्याची मागणी वाढणार असल्याने नियोजनात कोणत्याही चुका होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. सर्व विभागांनी एकत्रितपणे यासाठी काम करावे. रोजचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वॉररुमला येईल याची खबरदारी घ्यावी. मानवी वस्तीत बिबट्याच्या वाढत्या संचाराचे मोठे आव्हान असून पिंजरे लावूनही बिबटे सापडत नाही. यासाठी ड्रोनचा अधिक वापर करावा.

दुपारी दोन वाजेपासून पालकमंत्र्यांनी नागरिकांच्या भेटी घेण्यास प्रारंभ केला. प्रत्येक नागरिकाचा अर्ज स्वीकारून त्यांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. व्यक्तिगत संवादातून त्यांनी नागरीकांच्या समस्यांचे यशस्वीपणे निराकरण केले.

अहिल्यानगर महानगरपालिका, परिवहन, भूमी अभिलेख, जलसंपदा, महावितरण या विभागाच्या संदर्भातील अर्ज जनता दरबारात प्राप्त झाले. प्राप्त झालेल्या सर्व अर्जावर गांभीर्याने कार्यवाही करून पालकमंत्री कार्यालयास आणि संबंधित अर्जदारास केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

# आंतरराष्ट्रीय विमानतळावरील टी-१ व टी-२ येथे प्रीपेड ऑटो रिक्षा सेवा सुरू करणेसाठी मंत्रालयात बैठक घेतली

मुंबई, ता. १७ : छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील टी-१ व टी-२ येथे प्रीपेड ऑटो रिक्षा सेवा सुरू करणेसाठी माजी खासदार गजानन कीर्तिकर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासोबत मंत्रालयात बैठक घेतली. अनेक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विमानसेवा या टर्मिनलचा वापर करीत असल्यामुळे प्रवाश्यांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढत आहे. आजमितीस या दोन्ही टर्मिनलवर फक्त टॅक्सी प्रीपेड सेवा सुरू आहे. टॅक्सी चालकांना तासनतास वाट बघितल्यानंतर त्यांचा नंबर लागतो, अशातच विलेपार्ले, अंधेरी, सांताक्रुझ अशी जवळचे भाडे त्यांच्या वाट्यास



आल्यास, त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. जवळच्या परिसरात जाण्यासाठी प्रवासी रिक्षास प्राधान्य देतात. विमानतळाबाहेर अनधिकृतपणे रिक्षा चालक व्यवसाय करीत असून प्रवाश्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक देखील करतात. याठिकाणी प्रीपेड टॅक्सी सेवेप्रमाणेच प्रीपेड ऑटो रिक्षा सेवा सुरू करणेसाठी कीर्तिकर यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मे. अदानी एअरपोर्ट, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी यांचेकडे सातत्याने पाठपुरावा केला. सर्व विभागांचे सकारात्मक अहवाल असताना देखील मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी कार्यवाही करण्यास दिरंगाई करीत होते.

या विषयाबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे मंत्रालयातील दालनात संबंधित सर्व अधिका-यांसोबत आज बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन प्रीपेड ऑटो रिक्षा सेवा १ जून २०२५ पासून सुरू करण्यात येईल असे आश्वासन मंत्रीमहोदय यांनी दिले. सदर प्रीपेड ऑटो रिक्षा सेवेचे व्यवस्थापन स्थानिक 'हॅप्पी टू हेल्प' ही सामाजिक संस्था करण्यास तयार आहे. या बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, प्रादेशिक परिवहन विभाग अंधेरीचे अनिल पाटील, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाचे अश्विनी कुमार व हॅप्पी टू हेल्प संस्थेचे मकबूल मुजावर व इरफान शेख हे उपस्थित होते.

## कांद्यावरील २०% निर्यात शुल्क हटवणार?

लासलगाव : केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर लादलेले २० टक्के शुल्क लवकरच हटवले जाऊ शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि राजस्थानमध्ये नवीन कांद्याची आवक झपाट्याने वाढत असल्याने बाजारात कांद्याचे भाव सातत्याने घसरत आहेत. परिणामी, शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. कृषी मंत्रालयाच्या माहितीनुसार, यंदा कांद्याखालील लागवड क्षेत्र मागील वर्षाच्या तुलनेत २५ टक्क्यांनी वाढले आहे, त्यामुळे उत्पादन मोठ्या प्रमाणात होणार आहे. २८ फेब्रुवारी रोजी केंद्रीय कृषी मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, या हंगामात १०.२९ लाख हेक्टर क्षेत्रात कांद्याची लागवड झाली आहे.

# युवकांनी प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेतंर्गत सहभाग नोंदविण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर,दि.१७, :- भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ कॉरपोरेट अफेअर्स अंतर्गत प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना सुरू करण्यात आलेली आहे. या इंटर्नशिप योजनेसाठी २१ ते २४ वयोगटातील पुर्णवेळ शिक्षण, कौशल्य किंवा नोकरीत नसलेल्या भारतीय युवा वर्ग पात्र आहे. या योजनेअंतर्गत भारतातील नामांकित कंपन्यांमध्ये युवकांना १२ महिन्यांचे प्रशिक्षण (इंटर्नशिप) दिले जाणार आहे. प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रू.५०००/- आर्थिक सहायता व एकरकमी सहायता रू.६०००/- देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांस प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षण दिले जाणार आहे. १ कोटी भारतीय युवा वर्गाला प्रशिक्षण (इंटर्नशिप) देण्याचे भारत सरकारचे उद्दिष्ट आहे.

या इंटर्नशिप योजनेअंतर्गत सहभाग नोंदविण्यासाठी http://pminternship.mca.gov.in या वेबसाईटवरील Register Now या टॅबवर क्लिक करून उमेदवारांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करण्यासाठी उमेदवारांच्या आधार क्रमांकास मोबाईल क्रमांक लिंक असणे आवश्यक असून आधार लिंक मोबाईल क्रमांकावर ओटीपी पाठविण्यात येतो. त्यानंतरच उमेदवारांची नोंदणी होवू शकते. अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक ३० मार्च, २०२५ असा आहे.

जिल्ह्यातील २१ ते २४ वयोगटातील जास्तीत जास्त पात्र युवक-युवतींनी प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेअंतर्गत नोंदणी करून प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून घ्यावी व अधिक माहितीसाठी आपल्या जिल्ह्यातील जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, या कार्यालयास भेट द्यावी, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालयाच्या उपआयुक्त विद्या शितोळे यांनी प्रसिद्धीपत्रद्वारे केले आहे.

# रा.स्व. संघातून मला जीवनमूल्ये आणि संस्कार मिळाले, हे माझे भाग्यच - पंतप्रधान

नवी दिल्ली - गेल्या १०० वर्षात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भारताच्या चकाचकतेपासून दूर राहून साधकाप्रमाणे समर्पण भावाने काम केले आहे. अशा पवित्र संस्थेतून मला जीवनमूल्ये आणि संस्कार मिळाले, हे माझे भाग्य आहे, अशी भावना पंतप्रधन नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रसिद्ध अमेरिकन पॉडकास्टर लेक्स फ्रिडमॅन यांना प्रदीर्घ मुलाखत दिली. तब्बल तीन तासांची ही मुलाखत एखाद्या परदेशी खाजगी माध्यमाला दिलेली पहिलीच मुलाखत आहे. ही आज (रविवार) रिलीज करण्यात आली.

मोदी म्हणाले की, आमच्या गावात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा होती, तिथे देशभक्तीपर गाणी वाजवली जायची. त्या गाण्यांमधील काही गोष्टी मला खूप स्पर्शून गेल्या आणि अशा प्रकारे मी संघाचा भाग झालो. संघामध्ये आम्हाला दिलेल्या मूलभूत मूल्यांपैकी एक म्हणजे तुम्ही जे काही कराल, ते एका उद्देशाने करा. राष्ट्रासाठी योगदान देण्यासाठी करा. उदाहरणार्थ, मी अभ्यास केला तर मी इतका अभ्यास केला पाहिजे की तो देशासाठी उपयुक्त ठरावा. मी व्यायाम केला, तर इतका व्यायाम केला पाहिजे की, माझे शरीरही देशासाठी उपयुक्त ठरावे. हेच संघवाले शिकवतात. संघ ही खूप मोठी संघटना आहे. आता संघाचा १०० वा वर्धापनदिन जवळ आला आहे. एवढी मोठी स्वयंसेवी संस्था कदाचित जगात कुठेही अस्तित्वात नाही. संघाशी करोडो लोक जोडले गेले आहेत. पण संघाला समजून घेणे इतके सोपे नाही. त्याच्या कार्याचे स्वरूप खरोखर समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कोणत्याही गोष्टीपेक्षा, संघ तुम्हाला एक स्पष्ट दिशा प्रदान करतो, ज्याला खरोखर जीवनाचा एक उद्देश म्हणता येईल.

दुसरीकडे देश सर्वस्व आहे आणि जनसेवा हीच ईश्वर सेवा आहे. हे वैदिक काळापासून सांगितले जाते. हेच आपल्या ऋषीमुनींनी सांगितले आहे, हेच विवेकानंदांनी सांगितले आहे आणि हेच संघाचे लोक म्हणतात. संघाकडून मिळालेली प्रेरणा घेऊन तुम्ही समाजासाठी काहीतरी करा, असे स्वयंसेवक सांगतात आणि त्याच भावनेने प्रेरित होऊन आज अनेक उपक्रम सुरू आहेत. उदाहरणार्थ, काही स्वयंसेवकांनी सेवा भारती नावाची संस्था स्थापन केली. ही संस्था झोपडपट्ट्या आणि वस्त्यांमध्ये राहणाऱ्या गरीब लोकांना सेवा देते. यालाच ते सेवा समाज म्हणतात. माझ्या माहितीनुसार, ते जवळपास १ लाख २५ हजार सेवा प्रकल्प कोणत्याही सरकारी मदतीशिवाय आणि केवळ समुदायाच्या पाठिंब्याने चालवतात. ते तिथे वेळ घालवतात, मुलांना शिकवतात, त्यांच्या आरोग्याची काळजी घेतात, चांगले संस्कार देतात आणि या समुदायांमध्ये स्वच्छता सुधारण्यासाठी कामे करतात. ही काही छोटी उपलब्धी नाही.

संघाने पालनपोषण केलेले काही स्वयंसेवक वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून आदिवासी समाजाची सेवा करण्यासाठी समर्पित आहेत. ते आदिवासींमध्ये राहतात आणि त्यांच्या कल्याणासाठी काम करतात. त्यांनी दुर्गम आदिवासी भागात ७० हजारांहून अधिक शाळा उघडल्या आहेत. अमेरिकेतही असे काही लोक आहेत, जे त्यांच्यासाठी १० किंवा १५ डॉलर्स दान करतात. काही स्वयंसेवकांनी शिक्षणात क्रांती करण्यासाठी विद्या भारतीची स्थापना केली आहे. आज ते सुमारे २५ हजार शाळा चालवतात, सुमारे ३० लाख विद्यार्थ्यांना शिक्षण देतात आणि मला विश्वास आहे की, या उपक्रमामुळे कोट्यावधी विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे. शिक्षणासोबतच मूल्यांनाही प्राधान्य दिले जाते आणि विद्यार्थी समाजावर ओझे बनू नयेत, यासाठी त्यांनी डाउन टू अर्थ राहून कौशल्ये शिकवली जातात. म्हणजेच जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मग ती महिला असो, तरुण असो किंवा मजूर असो, संघाने भूमिका बजावली आहे.




# पैठण; नाथषष्ठी यात्रोत्सवानिमित्त वाहतूक मार्गात बदल

छत्रपती संभाजीनगर,दि.१७(जिमाका)- पैठण येथे दि.१८ ते २२ या कालावधीत संत एकनाथ महाराज नाथषष्ठी यात्रोत्सव आहे. राज्यभरातून अंदाजे १२ ते १५ लाख भाविक विविध वाहनाने वा पायी यात्रा उत्सवाकरीता येत असतात. या कालावधीत वाहतुकीची कोंडी निर्माण होऊ नये यासाठी पैठणकडे जाणारी व येणारी जड वाहतूक मार्गात बदल करण्यात येत असल्याचे आदेश पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड यांनी निर्गमित केले आहेत.

वाहतुक मार्गातील बदल याप्रमाणे- पूर्वीचा जड वाहतूक मार्गः-

१. शहागड कडून - आपेगाव मार्गे पैठणकडे २. पाचोड - पैठण- बिडकीन - इसारवाडी फाटा - अहिल्यानगर हायवे ३. सोलापूर धुळे एनएच - ५२ महामार्ग कचनेर फाटा, पोरगाव चौफुली, बिडकीन - शेकटा - इसारवाडी फाटा - छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर हायवे मार्गे अहिल्यानगर कडे ४. जालना कडून करमाड - कचनेर फाटा - पोरगाव - बिडकीनचे शेकटा इसारवाडी फाटा - छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर हायवे मार्गे अहिल्यानगर कडे अथवा छत्रपती संभाजीनगर कडे ५. छत्रपती संभाजीनगर ते बिडकीन - पैठण कडे ६. छत्रपती संभाजीनगर ते बिडकीन - पैठण कडे ७. शेवगाव जि.अहिल्यानगर कडून पैठण मार्गे छत्रपती संभाजीनगर कडे जाणारी जड वाहतूक

पर्यायी जड वाहतूक मार्गः-

१. शहागड - पाचोड - मार्गे छत्रपती संभाजीनगर कडे जाईल. २. पाचोड - आडूळ - छत्रपती संभाजीनगर बाय पास मार्गे अहिल्यानगरकडे ३. सोलापूर धुळे एनएच -५२ महामार्ग बीड कडून येणारी जड वाहतूक ही एनएच -५२ मार्ग ते सरळ पुढे ए-एस क्लब मार्गे छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर हायवेने अहिल्यानगरकडे जातील. याचप्रमाणे उलट दिशेने वाहने ये जा करतील. ४. जालनाकडून येणारी जड वाहतूक ही करमाड - कचनेर फाटा - सोलापूर धुळे एनएच-५२ महामार्ग ते सरळ पुढे ए-एस क्लब मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे किंवा छत्रपती संभाजीनगर कडे जातील. या प्रमाणेच उलट दिशेने वाहने ये-जा करतील. ५. छत्रपती संभाजीनगर - वाळूज पैठण खेडा - रांजणगाव खैरी - शेकटा ब्रह्मगव्हाण - लोहगाव - जळगाव - जळगाव लोहगाव फाटा - ढोरकीन - मार्गे पैठण कडे जातील. या प्रमाणेच उलट दिशेने वाहने ये - जा करतील. ६. छत्रपती संभाजीनगर पाचोड मार्गे पैठणकडे जातील. या प्रमाणेच उलट दिशेने वाहने ये-जा करतील. ७. शेवगाव - नेवासा फाटा - वाळुजमार्गे - छत्रपती संभाजीनगर कडे जातील.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माणसाचे ध्येय निश्चित असेल तर तो जीवनात यशस्वी होतो -ह.भ.प.डॉ.भगवान बाबा आनंदगडकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

स्व. बाजीराव पाटील चव्हाण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने क्षेत्र आनंदगड येथे धुलीवंदनाच्या मुहूर्तावर मागील तीन वर्षापासून त्रैभाषिक मुशायरा व कवी संमेलनाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्याकडून करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. श्री ह भ प भगवान बाबा आनंदगडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध कवी व साहित्यिक डी. के. शेख यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. ह भ प भगवान बाबा आनंदगडकर म्हणाले की, माणसाने ध्येयाकडे लक्ष द्यावे ध्येय जर निश्चित असेल तर तो जीवनात निश्चितच यशस्वी होतो. कवींचे गुण, विचार आपण आत्मसात केले तर निश्चितच विवेकावर आरूढ होणार असेही ते म्हणाले. संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी सुरू केलेल्या कार्यक्रमाबद्दल उद्देशून भगवानबाबा म्हणाले की, इस जहाँ को तो हम अच्छा नही बना सकते ! लेकिन इन जहाँ की कुछ काँटे हम कम कर सकते है ! यावेळी संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण प्रास्ताविकपर भाषणात म्हणाले की,



स्व. बाजीराव पाटील चव्हाण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने व ह. भ. प. भगवान बाबा आनंदगडकर यांच्या आज्ञेप्रमाणे त्रैभाषिक कवी संमेलन व मुशायरा या कार्यक्रमाचे मागील तीन वर्षापासून आयोजन करीत आहे . या सामाजिक कार्यक्रमातून समाजातील बंधुत्व, प्रेम, ऐक्य दृढ व्हावे याच उद्देशाने या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली असून मराठी, हिंदी व उर्दू कवी यांना संस्थेच्या वतीने व्यासपीठ देऊन त्यांचा स्मृतीचिन्ह देऊन मानसन्मान करण्यात येतो.

धुलीवंदनाच्या शुभ मुहूर्तावर रसिकांना याचा आनंद घेता यावा अशी आपली प्रामाणिक इच्छा आहे . यावेळी उपस्थित कवींनी आपल्या विचार व कलेतून अनेक कविता सादर केल्या. कवी कमलकिशोर शर्मा, सुनील लोणकर, श्रीमती मंगला धुपे , राम गायकवाड, सुहास सदावर्ते,अशोक खेडकर, प्रभाकर शेळके, कैलास भाले, दीपक राखुंडे, पंढरीनाथ सारके,लक्ष्मीकांत दाभाडकर,छाया वाघ, मनिषा गायकवाड, शोभना भालेराव, सुहास पोतदार, जिजा वाघ, कृष्णा कदम शिवाजी तेलंगे, कन्नुलाल विठोरे, गणेश खरात , विनोद काळे, मुस्तकीम अर्शद,आरेफ भाई, मौलाना राही, अब्दुल फतहान ,हाफिज आनिस, परवेज आलम ,नईम खान, नाझीम शेख यांच्यासह अनेक कवींची उपस्थिती होती. यावेळी मराठी कवी संचालन चाफेश्वर गांगवे व उर्दू कवी संचालन फारूक शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन नवनाथ लोखंडे यांनी केले. याप्रसंगी विजय चव्हाण, जि. म. बँकेचे कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख, धैर्यशील चव्हाण, आण्णासाहेब चित्तेकर,जालना शहर कार्याध्यक्ष मिर्झा अनवर बेग, माजी नगरसेविका मणकर्णा डांगे, शहराध्यक्ष रिंकल तायड, राष्ट्रवादी काँग्रेसचे बदनापूर तालुका अध्यक्ष कैलास मदन, दत्तू अंभोरे , सतीश ढवळे, संतोष ढेंगळे, उमेश मोहिते,सतिश वाहूळे, प्रभाकर घेवंदे,वैभव नालेगावकर, समाधान राठोड,कृष्णा गाडेकर, संदीप गाडेकर, पद्माकर हांडे, संतोष डुकरे, रामू पोकळे, गणेश डुकरे, सिद्धेश्वर शिंदे, राहुल लष्कर, दिलीपतात्या क्षीरसागर, पुंजाराम मोहिते, विठ्ठल मोहिते, अमोल खरात, आकाश श्रीरामवार, समी भाई, संगीता नागरगोजे, बद्री क्षिरसागर, इम्रान मणियार यांच्यासह अनेक रसिक बांधव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### बोरगाव ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी प्रस्थान

**दिंडी मार्गाने ५०० वृक्षारोपण करणार -ह.भ.प.मार्तंड महाराज फदाट**



**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

दक्षिणकाशी म्हणून जगात ओळख असलेला पैठण येथील श्री संत एकनाथ महाराजांचा षष्ठी महोत्सवानिमित्त बोरगाव ते पैठण पायी दिंडी १२ मार्च रोजी बोरगावबु ता.जाफ्राबाद येथुन शेकडो वारकरी सहभागी होत हभप मार्तंड महाराज फदाट (बोरगावकर )यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी पैठण कडे मार्गस्थ झाली. पायी तिर्थयात्रा नामस्मरण, संतसंगती, पवित्र गोदावरी तिर्थस्नान, दररोज भजन, प्रवचन, किर्तन या सर्वांचा लाभ घेत शेवटी शांती ब्रम्हानाथ महाराज ज्यांची श्री. हरीने ३६ वर्षे प्रत्यक्ष सेवा केली,श्री.दत्तात्रय महाराज यांच्या व्दारावर व्दारपाल म्हणुन उभे असत अशा महान संतांच्या चरणी नतमस्तक होऊ या. संतांची शिकवण जिवनात उत्तरखुन आनंदाच्या अनुभुतीने कृतार्थ होता येईल. या उद्देशाने हा सोहळा आयोजित केला असुन वारकरी सांप्रदायाचा प्रसार करूनशांती ब्रम्ह नाथ महाराजांचे विचार जनसामान्यांपर्यंत नेण्याचा हा प्रयत्न असल्याचे हभप मार्तंड महाराज फदाट (बोरगावकर) यांनी म्हटले ते पुढे म्हणाले की, पायी दिंडीतील भाविक दरकोस दरमजल करत बोरगाव येथुन सुरू झालेली दिंडी जानेफळ,जवखेडा आश्रम, राजूर,कंडारी, राजापूर, बालानगर मार्गे वाहेगाव याठिकाणी मुक्कामी थांबत २१ मार्च रोजी पैठण येथे दिंडीचे आगमन होईल. या दिंडीत पोलिस प्रशासनाच्या वतीने दिंडीला संरक्षण देण्यात आले आहे. दिंडीत विशेष म्हणजे सामाजिक उपक्रम हाती घेत ज्या वेळी दिंडी कुठेही विश्रांती,चहापाणी साठी थांबेल तिथे प्रत्येकी १ झाड लावून अशा दिंडी मार्गाने ५०० हुन अधिक वृक्षारोपण करण्यात येणार असल्याची महिती हभप मार्तंड महाराज यांनी दिली.प्रवासात टाळ, पताका, मृदुंग हरिनामाच्या गजरच्या समूहात शेकडो वारकरी पैठण कडे रवाना झाले आहे.दिंडी वारकऱ्यांची नाष्टा,जेवण ची सोय करण्यासाठी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी जबाबदारी उचलली आहे.

### समाज कल्याण विभागाकडून लोकशाही दिनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जनतेच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी सहायक आयुक्त स्तरावर जनता तक्रार निवारण दिन, लोकशाही दिनाच्या आयोजन करण्याबाबत आयुक्तालयाचे निर्देश आहेत. तरी समाज कल्याण कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अडचणी संदर्भात तसेच या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय वसतिगृह किंवा शासकीय निवासी शाळेमध्ये पुरविण्यात येणाऱ्या सोई-सुविधांच्या विषयी असणाऱ्या समस्या, तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सोमवार दि. २४ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता समाजकल्याण कार्यालय, जालना येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी संबधितांनी आपल्या तक्रारी लेखी स्वरूपात घेऊन वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बुधवारी बैठक

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठक बुधवार दि.१९ मार्च २०२५ रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठकीत ज्या अर्जदारांना शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्याविरुध्द भ्रष्टाचार, गैरव्यवहार, अफरातफर आणि विलंब केल्याबाबत तक्रार द्यावयाची असेल त्यांनी संबंधित तालुका भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे सबळ पुरावे सादर करुन तक्रार द्यावी, असे जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अंगणवाडी सेविका भरतीमध्ये मोठा भ्रष्टाचार, पुढाऱ्यांच्या दबाव तंत्रामुळे अधिकाऱ्यावर दडपण

**पुढाऱ्यांच्या सांगण्यावरून भ्रष्ट अधिकारी पैसे घेऊन झाले मालामाल गोविंदपूर येथील महिलेची मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार**

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत झालेल्या अंगणवाडीच्या मदतनीस पदासाठी मोठा भ्रष्टाचार झाला आहे ,पात्र लाभार्थ्याला सोडून इतर महिलेस मदतनीस म्हणून घेण्यात आले असल्याचा आरोप सदरील महिलेने आपल्या तक्रारीत केला आहे.खाजगी एजंटच्या माध्यमातून आर्थिक देवाणघेवाण करून व्यवहार झाला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करावी नसता १७ मार्च २०२५ पासून अंबड पंचायत समितीसमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा गोविंदपूर (ता. अंबड) येथील कविता रमेश जाधव यांनी दिला आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले की, एकात्मीक बालविकास सेवा योजना प्रकल्प १ व २ ग्रामीण अंबड अंतर्गत झालेल्या अंगणवाडीच्या मदतनीस पदाच्या भरतीत मोठ्या प्रमाणात घोळ व भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप आहे. मदतनिस निवड प्रक्रियेत पारदर्शकता न ठेवल्याचा आरोप कविता रमेश जाधव यांनी केला. दरम्यान, शासनाच्या मार्गदर्शक तत्वाचे पालन न करण्यात येऊन शैक्षणिक अर्हता, गुणवत्ता, वय, रहिवाशी,बोली, भाषा आदी निकष डावलून बालविकास प्रकल्प अधिकारी व समितीतील सदस्यांनी व्यक्तिगत फायद्यासाठी पडद्याआडून खाजगी एजंटच्या माध्यमातून लाखो रूपये घेतल्याचा आरोप सदरील महिलेने केला आहे. या भरती संदर्भात हरकत घेतली आहे. त्या हरकतीवर समाधानकारक उत्तर न देता केवळ आर्थिक व्यवहारापोटी ऑर्डर देण्यात आली आहे. गुणवत्ता डावलून आमच्यावर अन्याय केला असल्याचा आरोप ही याठिकाणी करण्यात आला आहे. गोविंदपूर येथे मदतनिस पदाची एक जागा रिक्त होती. त्यासाठी कविता रमेश जाधव यांनी गावचे रहिवासी म्हणून अर्ज दाखल केला मात्र पुढाऱ्यांच्या जवळचे कार्यकर्त्यांनी गावचे रहिवासी नसुन पैशाच्या व वशिलेबाजीच्या जोरावर अंगणवाडी मदतनीस म्हणून अर्ज दाखल केला आहे. त्या संदर्भात जिल्हाधिकारी यांना पडताळणी संदर्भात अर्ज ही देण्यात आला आहे.

ज्याचा आहे वशीला त्याचे कुत्र काशीला या म्हणी प्रमाणे गोविंदपुर या महसूल अंतर्गत अंगणवाडी मदतनीस ही रिक्त जागा भरण्यासाठी काही पुढाकारी व पैशाच्या वशील्यावरती गावचे रहिवासी नसुनही अर्ज दाखल केला आहे तरी ही तो अर्ज बाद झाला नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोष असणाऱ्या अधिकारी यांच्यावर कडक कार्यवाही करून मला न्याय देण्यात यावा अशी मागणी सदरील महिलेने केली आहे.

# शेतकऱ्यांनी ग्रिस्टॅक ओळख क्रमांकासाठी नोंदणी करावी

**-जिल्हाधिकारी पांचाळ यांचे आवाहन**



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

कृषि विभागाच्या शासन निर्णयान्वये राज्यात दि. १ डिसेंबर २०२४ रोजी पासुन अग्रिस्टॅक योजना राज्यात राबविण्यात येत आहे. त्यानुसार जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांचा माहिती संच तयार करण्यात येत असुन शेतकऱ्यांना त्यांचा शेतकरी ओळख क्रमांक देण्याबाबतचे कामकाज करण्यात येत आहे. सद्यस्थितीत कॉमन सर्विस सेंटर/नागरी सुविधा सेवा केंद्रामार्फत शेतकऱ्यांची नोंदणी सुरु आहे. तरी शासनाच्या विविध योजनेचा लाभ वेळेवर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ग्रिस्टॅक ओळख क्रमांकासाठी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

ॲग्रिस्टॅक योजनेमध्ये शेतकऱ्यांना अद्वितीय ओळख क्रमांक मिळतो. ज्यामध्ये त्यांचे आधार क्रमांक व जमिनीचा सातबारा याची माहिती समाविष्ट असते. या योजनेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीसंदर्भात शेतात घेतलेली हंगामी पिके, त्यांचे भौगोलिक स्थान यांची एकत्र माहिती पाहता येते, तसेच कृषि विषयक संसाधनाचा वापर योग्य रितीने वापर करणे, प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा लाभ, हवामान अंदाज, मृदा आरोग्य तपशील आणि योग्य पीक सल्ला मिळतो. तर पीक विमा योजनेचा लाभ सोपा होतो. डिजीटल पीक कर्ज मिळवणे सोपे होते, या करीता सर्व शेतकऱ्यांनी त्यांचे शेतकरी ओळख क्रमांक तयार करुन घेणे आवश्यक आहे.



राज्याचे उद्योग व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री नामदार इंद्रजीत नाईक हे श्री गीता रामायण सत्संग ज्ञान सोहळ्यानिमित्त जालना दौऱ्यावर आले असता त्यांनी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयास सदिच्छा भेट दिली त्यावेळी त्यांचे स्वागत करताना धैर्यशील चव्हाण. यावेळी रायुका जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सरकटे, संतोष ढेंगळे, विजय सोनवणे, उमेश मोहिते, समाधान राठोड, कृष्णा गाडेकर, संतोष डुकरे, संदीप गाडेकर, महादेव गाडेकर, गणेश भुतेकर, यामुळे पोकळे आदी.

# वाळूची चोरटी वाहतुक करणारा हायवा ताब्यात, २ लाखांचा मुद्देमाल जप्त, पारध पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**



भोकरदन तालुक्यातील पारध पोलीस स्टेशन हद्दीतील आन्वापाडा रोडवर अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा हायवा पारध पोलिसांनी पकडला असून या कारवाईत हायवासह ५ ब्रास वाळू असा एकूण २० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अधिक माहिती अशी, की आन्वा पाडा रस्त्यावर बेकायदेशीररित्या चोरटी वाळूची वाहतूक होत असून या पारध पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने यांना मिळालेल्या या गुप्त माहितीच्या आधारे पारध पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक नेमाने व पो.अ सुनील जाधव यांनी आन्वापाडा जाणाऱ्या रोडवर पांढऱ्या निळ्या रांगाचा हायवा एम. एच १८ बीजी ५६५३ बेकायदेशीररित्या वाळू वाहतूक करताना पारध पोलिसांनी पकडला असून हायवा व वाळू असा २० लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये जमीर जफर शेख (वय २५, रा. जोमाळा, ता. भोकरदन) यास ताब्यात घेत सुनील सुखदेव जाधव पोलीस अमलदार नेमणूक पारध पोलीस स्टेशन यांच्या फिर्यादीवरून गुरन ५२/२०२५ कलम ३०३ (२), भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खा.डॉ.काळे यांच्या आक्रमक भूमिकेमुळे नद्या अतिक्रमण मुक्तीसह सीमारेषा निश्चितीसाठी बैठक

**बुधवारपासून पोलीस बंदोबस्तात नदीपात्रातील अडथळे दूर करण्याची धडक कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाने जलद हालचाल करत जालना शहरातून वाहणाऱ्या कुंडलिका व सीना नद्यांच्या अतिक्रमण मुक्तीसाठी आणि सीमारेषा निश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली असून, बुधवारी ही बैठक होईल आणि त्यानंतर नदीपात्रातील अडथळे दूर करण्याची धडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

शहरातील रामतीर्थ येथे गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, कुंडलिका सीना फाऊंडेशन, समस्त महाजन संस्था व विविध सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येणार आहेत. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी या उपोषणाला आज रविवार दि. १६ मार्च



रोजी भेट देऊन, उपोषणकर्त्यांचे म्हणणे जाणून घेतले. उपोषणकर्त्यांनी सांगितले की, जालना शहर आणि जवळपास २५ गावांच्या पाणलोटातून प्रवाहित होणाऱ्या कुंडलिका व सीना नद्या पाणलोटातील संत गाडगेबाबा घाणेवाडी तलाव, मोती तलाव, जामवाडी तलाव यासह अनेक लहानमोठ जलस्त्रोत पुनरूज्जीवीत व्हावेत म्हणून सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू आहेत. कुंडलिका सीना फाऊंडेशन आणि मुंबई येथील समस्त महाजन संस्था यांच्यासह विविध सामाजिक संस्था मागील काही वर्षांपासून व्यापक लोकसहभाग उभा करत काम करत आहेत.

पाणलोटासह शहरी भागातील नद्यांची सीमा पुररेषा निश्चित व्हावी. यादरम्यान येणारी सर्व अतिक्रमणे काढण्यात यावी यासाठी मागील दोन दिवसांपासून रामतिर्थ येथे उपोषण सुरू आहे. शहरी भागात सीना नदीपात्रात एक रस्ता अनधिकृतपणे बनविण्यात आलेला होता. वेळोवेळी आंदोलने निदर्शने करत विभागीय आयुक्तांसह सगळीकडेच विनवणी करणे सुरू होते. रस्ता अनधिकृत असल्याचे सांगूनही तो काढण्यासाठी प्रशासनाकडून टाळाटाळ सुरू होती. जिल्हाधिकारी महोदयांनी याबाबत आश्वासन देऊनही प्रत्यक्ष काम होत नव्हते, असे त्यांच्या निदर्शनास आणून दिले असता, डॉ. काळे यांनी तातडीनेमहानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर यांना उपोषणस्थळी बोलावून घेतले. संबंधित अधिकारी व पोलिस प्रशासन यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत, सीना नदीपात्रातील अनधिकृत रस्ता हटवण्याचे तसेच नदीसीमा व पुररेषा निश्चित करण्याचे आदेश देण्यात आले. खासदार डॉ. काळे यांनी रजेवर असलेले जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्याशी फोनवर थेट संवाद साधत तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले. महानगरपालिकेने दोन्ही नद्यांवर प्रत्येकी एक याप्रमाणे दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करून नदीसीमा निश्चित करण्याची जबाबदारी डॉ. पांचाळ यांनी सोपवली आहे. बुधवारपासून प्रत्यक्ष अतिक्रमण हटवण्याचे काम पोलिस बंदोबस्तात सुरू होईल, असे प्रशासनाने जाहीर केले आहे.

याप्रसंगी उपोषण करणारे सामाजिक कार्यकर्ते समस्त महाजन संस्थेच्या नुतन देसाई, कुंडलिका सीना फाऊंडेशन चे उदय शिंदे, धीरज शर्मा, जगदीश गौड, राजेंद्र अग्रवाल यांच्याशी डॉ. काळे यांनी प्रदीर्घ चर्चा केली. यावेळी उद्योजक घनशाम गोयल, शिवरतन मुंदडा, सुनिल रायठठ्ठा, डॉ रितेश अग्रवाल, डॉ विठ्ठल राजकर, प्रतिभा श्रीपत, डॉ संजय अंबेकर, मनोहर सरोदे, आशिष पाठक, नयन पाटील यांच्यासह मोठ्या संख्येत शहरवासीयांची उपस्थिती होती.

या निर्णयामुळे नदीपात्रात अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार असून, जालना शहर व परिसरातील जलस्त्रोतांचे संरक्षण आणि पुनरुज्जीवनाला गती मिळणार आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कन्नड तहसील कार्यालयात उबाठा गटाचे धरणे आंदोलन

तभा वृत्तसेवा

कन्नड: –दि.१७ मार्च – सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने दोन वर्षापूर्वी मंजुर असलेली मात्र अद्यापही पूर्ण न झालेली अपूर्णावस्थेतील कामे तात्काळ पूर्ण करण्यात यावी, या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) तालुका संघटक डॉ.अण्णा शिंदे यांनी सहकाऱ्यांसह कन्नड तहसील कार्यालयाच्या आवारात, दि.१७ मार्च सोमवार रोजी सकाळी ११ वा . धरणे आंदोलन सुरु करण्यात आले आहे.

या संदर्भात उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अंधानेर – जामडी – कोळवाडी – पेडकवाडी या रस्त्याची मजबुतीकरण खडी पूर्णपणे उखडली आहे. याच रस्त्यावरील घाटातील सुरुवातीचा ३०० मीटर रस्ता वन विभागाची परवानगी नसल्याने अपूर्ण आहे. यासाठी वनविभागाची परवानगी घेऊन काम पूर्ण करावे. प्रमुख जिल्हा मार्ग औराळा – शेरुडी – जेहुर या रस्त्यावरील शेरूडी ते जेहूर हे ६ किमी अपूर्ण काम पूर्ण करावे. कोळवाडी ते कळंकी या रस्त्याचे काम मंजूर असून ते काम तत्काळ सुरु करावे. कानडगाव ते खापरखेडा या रस्त्याचे काम सुरु करण्यात यावे.

या मागणीसाठी २४ फेब्रुवारी २०२५ रोजी संबंधित विभागास निवेदन देण्यात आले होते. मात्र संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी याची दखल न घेतल्याने आजपासून हे धरणे आंदोलन सुरु करण्यात आले आहे.

सायंकाळी सहाय्यक अभियंता श्रेणी१ सार्वजनिक बांधकाम उपविभाग (प.) कन्नड एन. डी.सूर्यवंशी यांच्या लेखी आश्वासनंतर सायंकाळी ५:३० वा. धरणे आंदोलन मागे घेण्यात आले या आंदोलनात डॉ. अण्णासाहेब शिंदे, सरपंच अशोक दापके सचिन पवार, गबरू जाधव, विकास राठोड, गोकुळ राठोड, रामदास साळुंखे, गणेश घुगे, संजय दापके, यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती

# विश्व हिंदू परिषद ;बजरंग दलाचे आंदोलन

तभा वृत्तसेवा

कन्नड: दि.१७ मार्च – खुलताबाद (रत्नापूर ) येथील औरंगजेबाची कबर हटविण्या साठी कन्नड तहसील कार्यालयाच्या आवारात विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी घोषणा देत दि .१७ मार्च रोजी दु. १२ वा. एक तासभर आंदोलन केले त्यानंतर तहसीलदार व सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांना निवेदन दिले, निवेदनात उझबेगी परकीय आक्रमक बाबर याचा वंशज क्रुरकर्मा औरंगजेब याची कबर छ. संभाजी महाराज नगर या शहरात आहे. वास्तविक, त्याचा मृत्यू अहिल्यादेवी नगर येथे झाला असताना त्याचे प्रेत काढून ते छ. संभाजीनगर येथे पुरले व त्याठिकाणी त्याची कबर करण्यात आली.याच औरंग्याने शिख गुरु तेगबहादूर यांची क्रूर हत्या केली. शिख गुरु गोविंदसिंह यांच्या दोन बाल साहेबजाद्यांना ते केवळ मुस्लिम होत नाहीत म्हणून त्यांना भिंतीत जिवंतपणी चिणून मारण्यात आले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची क्रूर त्याचे वर्णन करता येणार नाही अशी भयंकर यातनामय हत्या याने केली श्री. काशी विश्वेश्वराचे मंदिर याने फोडले, मथुरेला असणा–या सुंदर मंदिरांचा यानेच विध्वंस केला. सोरटी सोमनाचे मंदिर पुन्हा एकदा यानेच फोडले. त्र्यंबकेश्वर मंदिर, जेजुरी गड यावर हल्ले केले. हजारो हिंदूंच्या प्रेतांच्या राशी गावाबाहेर रचून भयानक क्रूर कत्तल केली. छत्रपती शाहू महाराजांचे अनेक वेळा धर्म परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. हिंदूंचे मोठ्या प्रमाणावर धर्मांतरण केले.

अश्या क्रूरकर्मा व आतातायी औरंगजेबाचे कुठलेही स्मारक अथवा कबर हि पूर्णपणे स्वतंत्र भारत देशात गुलामीचेच, अनंत यातनांचे प्रतिक आहे. आम्ही सर्व आपणांस विनंती करतो की, आपण हि कबर पुर्णपणे नष्ट करावी. परकीयांचे कुठलेही नामोनिशाण हे नष्ट झाले पाहिजे. तरी आपण योग्य पद्धतीने हि कबर पूर्णपणे काढून टाकावी. व हे न झाल्यास पूर्व सुचित करुन विश्व हिंदू परिषद, बजरंग दल हिंदू समाजाबरोबर रत्नापूर (खुलताबाद) जिल्हा छत्रपती संभाजीनगरकडे कार सेवेसाठी कूच करतील व औरंग्याची कबर उध्वस्त करतील.

## धारदार कोयता जप्त

नगर : रात्रीच्या वेळी भिस्तबाग चौक गजराज फॅक्टरीजवळ भिंतीच्या आडोशाला उभे राहून काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने दोघेजण रात्रीची गस्त घालत असताना पोलिसांना आढळून आले. त्यावेळी कर्तव्यावर असलेले पो. उप नि. शैलेश पाटील यांनी संशयित इसम अनिकेत राजेंद्र वडागळे व साहिल शरद कणगरे यांची अधिक चौकशी करून झडती घेतली असता त्यांचे ताब्यातील दोन फूट लांबीचा धारदार कोयता व एक एक्सेस मोटरसायकल मिळून आल्याने गुन्ह्याच्या पुढील तपासाकरिता जप्त करण्यात आले. याप्रकरणी पो. कॉ. किरण उकिरडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., बुलडाणा
Buldana Urban Co-op. Credit Society Ltd., Buldana

## जाहीर लिलाव

संस्थेत्या विभाग सिल्लोड येथील शाखा सिल्लोड, कन्नड, पिशोर येथील सोने चांदी कर्जदारांनी कर्जाची परतफेड नियमित न केल्याने त्यांना वारंवार सूचना/नोटिस देऊन सुद्धा त्यांनी कर्ज भरणा न केल्यामुळे त्यांनी तारण दिलेल्या सोने चांदी तारण यस्तूंचा जाहीर लिलाव ठेवण्यात आलेला आहे. तरी ईच्छूकांनी सदर लिलावात भाग घेण्यासाठी वेळेवर उपस्थित रहावे.

| अक्र. | शास्वा | कर्जदाराचे नाव व पत्ता | तारण वस्तूचे विवरण | वस्तूचे एकूण शुद्ध वजन |
|---|---|---|---|---|
| १ | सिल्लोड | पठाण शंकीर खान शेर खान मू.पो. ता. नुराणी मसजीद जवळ, अतार गल्ली, सिल्लोड | २ अंगठी | ३ ग्रॅम |
| २ | सिल्लोड | शेख वसिम शेख दीलावर मू.पो. ता. आयेशा मसजीद जवळ, मिर्झा कॉलनी, सिल्लोड | एअरिंग जोड।, रोवेनपिस १. एकदाणी १ | ७.८७५ ग्रॅम |
| ३ | सिल्लोड | रउफ कदीर शेख मू.पो. ता. जैनोदीन कॉलनी सिल्लोड | एअरिंग जोड १ | २.३२५ ग्रॅम |
| ४ | सिल्लोड | गोठवाल प्रभू विठ्ठलसिंग मू. पो, धनगर गल्ली, चारनेर वाडी, ता सिल्लोड | झुंबर टॉप्स १ बदाम रिंग १ | ९.१७५ ग्रॅम |
| ५ | सिल्लोड | शेख हरून शेख उस्मान मू.पो. ता. मौलाना आझाद हॉल आझाद नगर, सिल्लोड | पेंडल १ मनी ३९ | ५.४ ग्रॅम |
| ६ | कन्नड | प्रतिभा बाबासाहेब खरे मू, भोकनगाव पो. चिकलठाण ता. कन्नड | पोत १, टॉप्स १ जोड | ८.७७५ ग्रॅम |
| ७ | कन्नड | अरुण भाऊसाहेब काकडे मू, पो. पळसखेडा ता. कन्नड | पोत १, झुंबर टॉप्स १ जोड १ | १९.२ ग्रॅम |
| ८ | कन्नड | सै. सलीम सै. अकबर मू. पो. ता. सानीया नगर, कन्नड | सेवेनपिस १, एअरिंग जोड १ | ७.४२५ ग्रॅम |
| ९ | पिशोर | प्रतिभा बाबासाहेब खरे मू, भोकनगाव पो. चिकलठाण ता. कन्नड | ठुशी १, टॉप्स जोड १ | १.५२० ग्रॅम |

लिलावाचे ठिकाण– बुलडाणा अर्बन को. ऑप क्रेडिट सोसायटी मर्या. बुलडाणा र. नं. २६७ (मल्टिस्टेट) शाखा सिल्लोड पत्ता:– विभागीय कार्यालय सिल्लोड सहकार सुमन, श्रीकृष्ण नगर, जळगाव रोड, सिल्लोड ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर दिनांक : २०/०३/२०२५ वार गुरुवार रोजी वेळ: सकाळी ११ वाजता

संजय दळवी
विभागीय व्यवस्थापक विभाग सिल्लोड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११५/२०२५

१/– वर्षा अंबादास पवार, वय ७६ वर्ष, धंदा घरकाम, रा. श्री राम नगर पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव. ह. मु. हनुमंतखेडा, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर. २/– दुर्गाबाई देविदास पाटील, वय ४५ वर्षे, धंदा. शेती, रा. वसंतवाडी तांडा. पोस्ट, जळके, ता. जि. जळगाव. ३/– अनिल अंबादास पवार, वय ४० वर्षे, धंदा. शेती, रा. हनुमंतखेडा. ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, ४/– महेंद्र अंबादास पवार, वय ३५ वर्षे, धंदा. शेती, रा. सिंधी कॉलोनी पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव ह.मु. हनुमंतखेडा, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर. ५/– संगीता विजय वंजारी, वय. ३२ वर्षे, धंदा. शेती, रा. नाईक नगर पोस्ट कुर्हाड, ता. पाचोरा, जि. जळगाव. ६/– सरला एकनाथ चव्हाण, वय ३० वर्षे, धंदा. शेती, श. हनुमान वादी पोस्ट गाळण, ता. पाचोरा, जि. जळगाव.

विरूद्ध

कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत अंबादास गमन पवार यांचा दि. २७/०८/२०२४ रोजी मौजे पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव येथे मयत झालेले असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ६ ही वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी मयत अंबादास गमन पवार यांचे वारस असुन त्यांना मयत अंबादास गमन पवार यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमापत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि. /३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता. /०४/२०२५

आदेशावरून

क. लपीक — सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९८/२०२५

अर्जदार : १–सुकलाल रामचंद्र कोळी, वय ६४ वर्षे, धंदा शेती, २–संजु रामचंद्र कोळी वय– ४१ वर्षे धंदा– शेती, ३. सुनंदा बबन गोपाळ वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, ४–ताईवाई भास्कर गोपाळ वय ७१ वर्षे, धंदा घरकाम, ५–संगिताबाई तुकाराम कोळी, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, ६–रावसाहेब तुमाराम कोळी, वय २७ वर्षे, धंदा शेती, ७–सुनिल तुकाराम कोळी, वय– २६ वर्षे, धंदा– शेती, ८–भाउसाहेव तुकाराम कोळी, वय ३४ वर्षे, धंदा– शेती, ९–सरला तुकाराम कोळी, वय वर्षे, धंदा घरकाम, सर्व रा. सायगव्हाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन व्दारा जिल्हाधिकारी कार्यालय ओरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस. एन. उपासणी यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मोजे सायगव्हाण ता. कन्नड चे कायम रहीवाशी नामे रामचंद्र धर्मा कोळी हे होते ते दिनांक ०१/०१/२००५ रोजी मोजे सागव्हाण ता. कन्नड येथे मयत झाले असुन त्यांच्या पत्नी नामे शांताबाई रामचंद्र कोळी ही मागील १८–२० वर्षापुर्वीच मयत झालेली आहे. मयत रामचंद्र धर्मा कोळी यांना मुलगा नामे तुकाराम रामचंद्र कोळी हा होता तो दिनांक ०४/०९/२०१९ रोजी मयत झालेला आहे. मयत रामचंद्र धर्मा कोळी यांना मृत्यु पश्चात अर्जदार क्र. १ व २ मुले व अर्जदार क्र. ३ ते ४ हया मुली आहे तसेच मयत तुकाराम यांची पत्नी अर्जदार क्र. ५ ही असुन ती मयत रामचंद्र कोळी यांची सुन आहे. तर अर्जदार क्र. ६ ते ९ हे मयत रामचंद्र कोळी यांचे नातु असुन मयत तुकाराम कोळी यांचे मुले व मुली आहे. मयत रामचंद्र धर्मा कोळी यांना अर्जदार क्र. १ ते ९ हे वारस आहे.

अर्जदार यांना शासकीय, निमशाकीय विविध योजनेचा लाभ घेण्यासाटी, महसुल वइतर दप्तरी वारसाची नोंद घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे संबंधीत कार्यालयाने वारस प्रमाणपत्राची मागणी केल्याने अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणावावत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.


सबव हे जहीर प्रगटन. दिनांक १०/०३/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

# पैठण शहरातील फेरीवाल्यांना नगर परिषदे कडून सूचना




पैठण दि १७ :– नाथषष्ठी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पैठण शहरात रोडवर लागणाऱ्या फेरीच्या गाड्या तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकातील खाद्यपदार्थांच्या लागणाऱ्या गाड्यांना नगर परिषदेच्या वतीने अतिक्रमण विभाग प्रमुख अश्विन गोजरे, अशोकराव पगारे यांच्या पथकाने गाड्या रोडच्या बाहेर लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. पैठण नगर परिषदेच्या वतीने मुख्याधिकारी तथा प्रशासक संतोष आगळे यांच्या वतीने नाथषष्ठी यात्रा उत्सवाची जय्यत तयारी करण्यात येत असून शहरातील अतिक्रमण काढण्यावर जोर देण्यात आला आहे. अश्यात रस्त्यावर लागणाऱ्या खाद्य पदार्थाच्यागाड्या तसेच फेरीवाल्यांच्या गाड्यांना नगर परिषदेचे वरीष्ठ लिपिक अश्विन गोजरे, अतिक्रमण विभाग प्रमुख अशोकराव पगारे यांच्या पथकाच्या वतीने सूचना देण्यात आल्या आहेत.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.
१११ / २०२५

१/– निर्मलाबाई विष्णू सोनवणे, वय ५८ वर्ष, धंदा घरकाम, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/– विक्रम विष्णू सोनवणे, वय ३८ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/– मंगेश विष्णू सोनवणे, वय ३० वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत विष्णू काशिनाथ सोहनी उर्फ सोनवणे यांचा दि. २४/१०/२०२४ रोजी मौजे आमखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मयत झालेले असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ ही वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी मयत विष्णू काशिनाथ सोहनी उर्फ सोनवणे यांचे वारस असुन त्यांना मयत विष्णू काशिनाथ सोहनी उर्फ सोनवणे यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. १२/३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता. २९/०४/२०२५

आदेशावरून

क. लपीक — सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.२०३/२०२५

अर्जदार : कचरु सोनाजी नरवडे, वय ५५ वर्षे, धंदा मजुरी, रा. भामरे चौक, पाटील नगर, सिडको, त्रिमुर्ती चौक, नाशिक,

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.वी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हा वरील ठिकाणचा रहिवाशी असुन अर्जदाराचे वडील नामे सोन्या उर्फ सोनाजी केरु नरवडे हे मौजे गंगापुर ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ११/०९/१९९६ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले आहे व तसेच अर्जदाराची आई नामे अनुसया सोन्या उर्फ सोनाजी नरवडे ह्या दिनांक ०२/०२/२०११ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर येथे मयत झालेल्या आहे. मयत सोन्या उर्फ सोनाजी केरु नरवडे व मयत अनुसया सोन्या उर्फ सोनाजी नरवडे यांना अर्जदार कायदेशीर वारसदार असुन त्याच्या व्यतिरीक्त मयत सोन्या उर्फ सोनाजी केरु नरवडे व मयत अनुसया सोन्या उर्फ सोनाजी नरवडे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १५/३/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. २१५/२०२५

अर्जदार : १. मालनबाई भ्र.रघुनाथ सुखधान, २. प्रकाश पिता रघुनाथ सुखधान, दोघे रा.अगर वाडगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३. रंजना भ्र.अशोक भालेराव, रा. सिध्दनाथ वाडगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४. अंजनाबाई भ्र. सारंगधर रणयेवले, रा. लासुरगाव, ता.वैजापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.एम. गायकवाड, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ यांचे पती आणि अर्जदार नं. २ ते ४ यांचे पिता नामे रघुनाथ येसु सुखधान यांचा दि.२४/०८/२०२४ रोजी मौजे अगर वाडगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत रघुनाथ येसु सुखधान यांना अर्जदार नं. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत रघुनाथ येसु सुखधान यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचें हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत, अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १५/०३/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## संघ हीच जीवनगाथा



अलकः– (६८) अद्भुत

डॉक्टरजींच्या रेशीम बागेतील पवित्र समाधीच्या साक्षीने द्वितीय सरसंघचालक या नात्याने श्री. गुरुजींनी आत्मविश्वासाने; नम्रतेने व डॉक्टरांवरील असलेल्या त्यांच्या सखोल श्रद्धेने; आश्वासक जबाबदारी स्वीकारली. श्री गुरुजी जून १९४० पासून जून १९७३ पर्यंत ३३ वर्ष सरसंघचालक होते. तेहतीस वर्षात ३३ वेळा भारत वर्षाची त्यांनी परिक्रमा केली आहे; हे एक अद्भुत आहे, असं मला वाटतं. गुरुजींचा दृढसंकल्प राष्ट्राला परमवैभवी बनवा असा होता। जसे पारसमणी च्या (परिसाच्या) स्पर्शाने लोखंड पण सोने होते तसेच या सरसंघचालकाच्या स्पर्शाने अनेक कार्यकर्ते निर्माण झाले. त्यांना आपले निवासस्थान कोणते असा कोणी प्रश्न केला तर ते म्हणत ट्रेन का डिब्बा. कारण देशव्यापी अखंड प्रवास; कोणताही विराम नाही; कुठेही विश्राम नाही; कोणी आराम करण्याचा सल्ला दिला तर ते उत्तरायचे आता कुठला विश्राम, हाती घेतलेले कार्य पूर्ण झाल्यावर किंवा सरते शेवटी चितेवर. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# प्रत्येक वस्तूवर उत्पादनाची तारीख किंमत तसेच मुदत बाह्य तारीख पाहून माल खरेदी करावा – तहसीलदार मनिषा मेने



सोयगाव,दि.१७ मार्च : सोयगाव तहसील कार्यालयात जागतिक ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यांप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी तहसीलदार मनिषा मेने या होत्या तर नायब तहसीलदार काकासाहेब साळवे,संभाजी देशमुख बहुरे ग्राहक मंचाचे तालुका संघटक सुधीर कुलकर्णी व संजय शहापूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.सुधीर कुलकर्णी यांनी प्रास्ताविक भाषणात ग्राहक मंचाच्या कार्याची माहिती दिली

त्यानंतर संजय शहापूरकर यांनी सांगितले की ग्राहकांनी दैनंदिन जीवनात माल खरेदी करताना जागृत राहण्याची गरज आहे तसेच प्रत्येक वस्तूवर उत्पादनाची तारीख किंमत तसेच मुदत बाह्य तारीख पाहून माल खरेदी करावा अध्यक्ष भाषणाचा समारोप करताना तहसीलदार मनिषा मेने यांनी सांगितले की माल खरेदी करताना बिलाची मागणी करावी.त्यामुळे ग्राहक मंचात तक्रार करण्यास अडचण येणार नाही.या कार्यक्रमाला व्यापारी,ग्राहक मंचाचे सदस्य,तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. व्हि. डी. पाटील दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. १३३/२०२५ पुढील तारीख २६/०३/२०२५

अर्जदार : १. मुख्तयारशा चांदशा शहा, वयः ५५ वर्ष, धंदाः शेती, रा. रायगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. अब्दुलरहिम चांदशा शहा, वय. ४९ वर्ष, धंदा. शेती, रा. रायगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. इब्राहिमशा चांदशा शहा वय. ४६ वर्ष. धंदा. शेती. रा. रायगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. हकीमशा चांदशा शहा वय. ४४ वर्ष. धंदा. शेती.रा. रायगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. मलेखाबी मुसा शहा वय.७६ वर्ष, धंदा. घरकाम रा. पिसा देवी रोड अब्रार कॉलनी. औरंगाबाद ६. खातिजाबी रउफ शाह वय. ६९ वर्ष धंदा. घरकाम. रा. तळणी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद. ७. रुबाबबी समद शहा वय. ४७ वर्ष, धंदा. घरकाम. रा. पिंपरखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ८. शबाना दगडु शहा वय. ४९ वर्ष, धंदा घरकाम रा. महाराणा प्रताप नगर मिसारवाडी औरंगाबाद. ९. आलमनुर आरेफ शहा वय. ३९ वर्ष, धंदा घरकाम रा. नायगाव औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन. व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार क्र. १ ते ९ हे मयत चांदशा सुलेमानशा शहा यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ ते ९ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. मयम चांदशा सुलेमानशा शहा यांचे अर्जदार क्र. १ व ४ मुले व अर्जदार क्र. ५ ते ९ मुली आहे. नामे मयत चांदशा सुलेमानशा शहा यांना अर्जदार क्र. १ ते ९ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत. मयत चांदशा सुलेमानशा शहा अर्जदार क्र. १ ते ९ यांचे वडील हे दि. २७/११/२०१४ रोजी मयत झालेली आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा रायगाव येथे करण्यात आलेला आहे. मयत चांदशा सुलेमानशा शहा यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२८/२/२०२५

आदेशावरून

कनिष्ट लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कन्नड

जा.क्र.जे–३/१६१०/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बाबा पेटोल पंपाजवळ अदालत रोड
छत्रपती संभाजीनगर.
दि. ५/०३/२०२५

## (चौकशीची नोटीस)

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ५० अ (१) अन्वये.

चौकशी अर्ज क्रमांक : १९/२०२४ क. ५० अ (१)

अर्जदार :– श्री. ज्ञानेश्वर त्र्यंबक गिरी व इतर १

विरुध्द

गैरअर्जदार :– १) श्रीमती. वेणु भ्र रुपगीर गोसावी (मयत) रा. बरकापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

आपणास या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. गोसावी मठ ट्रस्ट, बरकतपुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. नोंदणी क्रमांक ए– ६८२ या न्यासाचा कारभार व व्यवस्था योग्य रितीने चालविण्याच्या दृष्टीने न्यासाला योजना (घटना) तयार करण्यासाठी वरील चौकशी अर्जाची सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर. विभाग, छत्रपती संभाजीनगर हे चौकशी करणार आहेत.

त्याअर्थी या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, वरील नमुद न्यासाच्या योजना मंजूर करणे बाबत किंवा योजनेच्या मसुदया बाबत हितसंबंधीत व्यक्तींची काही हरकत असल्यास किंवा कुणाला काही म्हणणे दयावयाचे असल्यास संबधितांनी लेखी हरकत / निवेदन देण्यासाठी दि. ०७/०४/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारेखेपासुन तीस दिवसांचे आत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद या कार्यालयात स्वतः अगर प्रतिनिधी किंवा वकीलांमार्फत हजर राहुन लेखी म्हणणे सादर करावे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत / निवेदन प्राप्त न झाल्यास प्रकरणांमधे पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

ही नोटीस दि.२५/०२/२०२५ रोजी माझ्या सहीनीशी व सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या शिक्क्यानिशी दिली.

अधिक्षक, (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

## अग्रलेख...

# सीमांकनाबाबत आवई उठविण्यात काय हशील?

देशात सध्या लोकसभा मतदारसंघांच्या सीमांकनावरून दोन तट पडले आहेत. याबाबत सरकारी पक्षाचा एक गट असून, दुसरा गट विरोध करणाऱ्यांचा आहे. आजवर देशात चार वेळा मतदारसंघांचे सीमांकन करण्यात आलेले आहे. त्याबाबत त्यावेळी फारसे आक्षेप घेतले गेले नाहीत. मात्र यंदा सीमांकनालाच आक्षेप घेतले जाऊ लागले असून, यानिमित्ताने केंद्र सरकारच्या अधिकारांनाच आव्हान दिले जात आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ८२ नुसार प्रत्येक जनगणनेनंतर सीमांकन आयोगाचे गठन केले जाते. या आयोगाची दोन मुख्य कामे असतात. पहिले काम म्हणजे लोकसभा आणि राज्य विधानसभा मतदारसंघांच्या सीमांचे पुनर्निर्धारण करणे आणि दुसरे काम म्हणजे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजातींसाठी आरक्षित मतदारसंघांचे पुनर्निर्धारण करणे. संविधानातील कलम १७० अनुसार कोणत्याही राज्य विधानसभेत कमीत कमी ६० आणि अधिकाधिक ५०० मतदारसंघ राहू शकतात. प्रत्येक सीमांकनासाठी नजीकच्या जनगणनेचा आधार घेतला जातो. गेल्या ७७ वर्षांत केवळ चार वेळा मतदारसंघांचे सीमांकन झाले. पहिला सीमांकन आयोग १९५२ मध्ये गठित करण्यात आला, ज्यासाठी आयोगाने १९५१च्या जनगणनेचा आधार घेतला. दुसरा सीमांकन आयोग १९६३ मध्ये गठित करण्यात आला, ज्याने १९६१ च्या जनगणनेचा आधार घेतला. तिसरा सीमांकन आयोग १९७३ मध्ये गठित केला गेला. यावेळी १९७१च्या जनगणनेचा आधार घेतला गेला. चौथा सीमांकन आयोग २००२ साली गठित केला गेला, ज्यासाठी २००१ ची जनगणना आधार मानली गेली. सीमांकनात लोकसंख्येतील बदल लक्षात घेऊन देशातील प्रादेशिक मतदारसंघांच्या सीमा निश्चित केल्या जातात. सीमांकन आयोग स्वतंत्रपणे काम करतो आणि कुणाच्याही नियंत्रणापासून मुक्त असतो. संविधानानुसार, आयोगाचे निर्णय अंतिम असतात आणि निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलू शकणाऱ्या कायदेशीर आव्हानांपासून ते मुक्त असतात. सीमांकन आयोगाचा अहवाल लोकसभा किंवा राज्य विधानसभेत सादर झाल्यानंतर, त्या आदेशांमध्ये कोणतेही बदल करता येत नाहीत. संविधानाच्या कलम ८२ अंतर्गत, संसद सीमांकन कायदा मंजूर करते आणि भारताचे राष्ट्रपती हे कार्य पूर्ण करण्यासाठी सीमांकन आयोग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वतंत्र उच्च-शक्तिशाली पॅनेलची नियुक्ती करतात. येत्या काळात होऊ घातलेल्या सीमांकनाला तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्यासह पंजाब सरकारने विरोध दर्शविला आहे. स्टॅलिन यांनी तर त्यांच्या भूमिकेला पाठिंबा मिळावा म्हणून किमान सात मुख्यमंत्री आणि माजी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. सीमांकन हा संघराज्यावर 'घोर हल्ला' आहे, जो लोकसंख्या नियंत्रण आणि सुशासन सुनिश्चित करणाऱ्या राज्यांना शिक्षा करतो, अशी स्टॅलिन यांची भूमिका आहे. त्यांनी याबाबत केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन माझी यांना पत्र लिहिले आहे. उत्तर भारताच्या तुलनेत दक्षिण भारतातील राज्यांची लोकसंख्यावाढ घटली असल्याने दक्षिणेतील मतदारसंघांच्या सीमांकनात दक्षिणेकडील राज्यांच्या वाट्याला येणाऱ्या मतदारसंघांची संख्या घटेल, अशी भीती स्टॅलिन आणि त्यांच्या सहकारी पक्षांनी व्यक्त केली आहे. तथापि, त्यांनी व्यक्त केलेल्या चिंतेमध्ये तथ्यांचा अभाव आहे. त्यासाठी सीमांकनाचा संविधानकर्त्यांचा उद्देश काय होता आणि त्याचे फायदे काय आहेत, हे जाणून घ्यायला हवे.

भारतातील पहिले सीमांकन १९५२ मध्ये करण्यात आले, त्यावेळी लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या जागा या प्रक्रियेद्वारे निश्चित केल्या गेल्या. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर भारतीय लोकसभेच्या जागांची संख्या ४८९ होती. १९७१ च्या जनगणनेच्या आधारे शेवटचे सीमांकन १९७६ मध्ये झाले, त्यानंतर जागांची संख्या ५४३ पर्यंत वाढली. येत्या काळात लोकसंख्यावाढीमुळे देशातील एकूण मतदारांची संख्या वाढून आठशेच्या जवळपास जाण्याची अपेक्षा आहे. वाढत्या लोकसंख्येच्या आधारे वेळोवेळी मतदारसंघांच्या सीमा पुन्हा आखण्याच्या प्रक्रियेला सीमांकन म्हणतात. आपल्या लोकशाहीत लोकसंख्येचे योग्य प्रतिनिधित्व व्हावे आणि सर्वांना समान संधी मिळावी म्हणून हे केले जाते. म्हणून लोकसभा किंवा विधानसभा जागांचे क्षेत्र पुन्हा परिभाषित किंवा पुनर्निर्धारित केले जाते. मतदारसंघांच्या सीमांचे पुनर्निर्धारण का करावे, याची कारणे आहेत. पहिला मुद्दा म्हणजे देशातील निवडणूक प्रक्रिया अधिक लोकशाहीवादी बनविण्यासाठी सीमांकन आवश्यक आहे. प्रत्येक राज्यात कालांतराने लोकसंख्येत बदल होतात, त्यामुळे वाढत्या लोकसंख्येला न जुमानता सर्वांना समान प्रतिनिधित्व मिळावे म्हणून मतदारसंघ पुन्हा निश्चित केले जातात. दुसरा मुद्दा म्हणजे वाढत्या लोकसंख्येनुसार मतदारसंघांचे योग्य विभाजन करणे हा देखील सीमांकन प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येक वर्गातील नागरिकांना प्रतिनिधित्वाची समान संधी मिळावी हाही या प्रक्रियेचा महत्त्वाचा उद्देश आहे. तिसरा मुद्दा म्हणजे निवडणुकांमधील राखीव जागांचा मुद्दा प्रत्येक निवडणुकीत प्रकर्षाने उपस्थित केला जातो. त्यामुळे जेव्हा जेव्हा सीमांकन केले जाते तेव्हा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजातींचे हित लक्षात घेऊन राखीव जागा देखील निश्चित कराव्या लागतात. कोणी असा प्रश्न उपस्थित केला की जनगणना हा सीमांकनाचा आधार आहे का? तर त्याचे उत्तर हो असेच द्यावे लागेल. भारतातील सीमांकनाची संपूर्ण प्रक्रिया जनगणनेच्या आकडेवारीवर आधारित आहे. लोकसंख्या सतत बदलत असल्याने आणि नवीन सीमांकनामुळे प्रत्येक मतदारसंघाची लोकसंख्या अंदाजे समान राहण्याची खात्री होते, त्यामुळे या प्रक्रियेतून पुन्हा पुन्हा जावे लागते. जनगणनेत सरकारकडे अधिकृत आणि तपशीलवार डेटा उपलब्ध होतो, जो अचूक सीमांकनासाठी आवश्यक असतो. संविधानात अशी तरतूद आहे की प्रत्येक सीमांकनासाठी, जनगणनेनंतर नवीन डेटा वापरला जाईल. भारतातील सीमांकनाची ही परंपरा १९५१ च्या पहिल्या जनगणनेपासून सुरू झाली, जेव्हा संविधानानुसार पहिल्यांदाच सीमांकन आयोगाची स्थापना करण्यात आली.

लोकसभा आणि विधानसभेत लोकसंख्येच्या आधारावर संतुलित प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे हा सीमांकनाचा मुख्य उद्देश आहे. स्वातंत्र्यापासून भारतात ही प्रक्रिया सुरू आहे. भारतातील सीमांकन परंपरेचा पाया संविधान सभेने घातला. १९५० मध्ये जेव्हा भारत प्रजासत्ताक बनला, तेव्हा संविधान निर्मात्यांनी लोकसंख्येनुसार लोकसभा आणि विधानसभेच्या जागा निश्चित करण्याचा निर्णय घेतला. संविधानाच्या कलम ८२ आणि कलम १७० मध्ये ते समाविष्ट करण्यात आले. यासाठी, सीमांकन आयोग नावाची एक विशेष संस्था स्थापन करण्याची तरतूद देखील करण्यात आली.

मतदारसंघांच्या सीमांकनामध्ये अनेक अडचणी येतात. विविध मुद्दे उपस्थित करून आयोगाच्या कामकाजात अडथळे आणले जातात. मतदारसंघांचे सीमांकन विविध राजकीय पक्षांच्या विशेषतः सत्ताधारी पक्षाच्या फायद्यासाठी केले जाते, असा आरोप होतो. यामुळे काही मतदारसंघ खूपच मोठे किंवा छोटे बनवले जातात. हे प्रामुख्याने पक्षांच्या राजकीय प्रभुत्वाच्या आधारे केले जाते या गैरसमजामुळे या प्रक्रियेला विरोध होतो. काही भागांमध्ये सीमांकन करताना धर्माचा प्राधान्याने विचार केला जातो, असा समज करून देण्यात विरोधक यशस्वी ठरतात आणि त्यामुळे समाजात असंतोष निर्माण होतो. स्टॅलिन आणि प्रभृतींची सीमांकनाला विरोध करण्याची हीच कारणे आहेत. पण सीमांकन आयोग ही स्वायत्त संस्था असून, ही संस्था निवडणूक आयोगाप्रमाणेच निःपक्षपणे काम करते. त्यांच्यावर कुठलाही दबाव नसतो, हे जाणून घेण्याची आवश्यकता आहे. आजवरची सीमांकनं काँग्रेसच्याच राजवटीत झालेली आहेत. सीमांकन ही एक नियोजित आणि संवैधानिक प्रक्रिया आहे. यामुळे असंतुलनामुळे काही राज्यांना दिलेले प्रतिनिधित्व वाढवण्यास किंवा कमी होण्यास मदत होईल. विशेष म्हणजे ही प्रक्रिया भारतीय संविधानाच्या अंतर्गत, स्वतंत्र आयोगाच्या शिफारशींनुसार पारदर्शकपणे केली जाणार असल्याने त्याबाबत किंतु-परंतु बाळगण्यात हशील नाही.

## दिल्ली दिनांक

# चीनच्या खर्चाने भारताला आव्हान!

**रवींद्र दाणी**

चीनने अचानक आपल्या सरंक्षण खर्चात प्रचंड वाढ करीत भारतासाठी नवी डोकेदुखी तयार केली. भारत-चीन सीमेवरील स्थिती व दक्षिण चीन महासागरातील स्थिती या दोन पैलूंकडे लक्ष देत चीनने हा खोडसाळ निर्णय घेतला आहे.

चीनच्या डोक्यात आणि मनात लडाख सीमेवरील स्थिती आणि तैवान आपल्या ताब्यात घेण्याची त्याची सुप्त महत्त्वाकांक्षा या दोन बाबी असल्याचे त्याच्या या निर्णयावरून दिसून येते.

मागील आठवड्यात चिनी पंतप्रधानांनी देशाच्या सरंक्षण खर्चात वाढ करीत तो २३२ बिलियन डॉलर एवढा करण्याची घोषणा केली. 'शांततेचे रक्षण करण्यासाठी ताकदीची आवश्यकता असते' असे विधान चिनी पंतप्रधानांनी यावेळी केले. चीनने सरंक्षण खर्चात केलेली ही वाढ मागील वर्षाच्या तुलनेत ७.२ टक्के अधिक आहे. नवी शस्त्रास्त्रे विकसित करणे, सीमेवरील सैनिकी व्यवस्था बळकट करणे, सैनिकांचे प्रशिक्षण, टेहळणी करणे यासाठी ही रक्कम खर्च केली जाणार आहे. चीनच्या अखंडतेला धोका निर्माण होत असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे चीनकडून वारंवार सांगण्यात येत आहे. चीनने सरंक्षण खर्चात वाढ करण्यासाठी वेगवेगळी कारणे सांगितली असली तरी त्याचा मुख्य रोख भारत व तैवानकडे आहे ही बाब स्पष्ट झाली आहे.

**अमेरिका पहिल्या क्रमांकावर** : संरक्षणावर खर्च करण्यात अमेरिका पहिल्या क्रमांकावर असून, या देशाने चालू आर्थिक वर्षात ८९० बिलियन डॉलर एवढा खर्च करण्याचे ठरविले आहे. म्हणजे चीनच्या चौपट रक्कम अमेरिका आपल्या संरक्षणावर खर्च करणार आहे. यातही अमेरिकेने आपल्या नौदलावर सर्वाधिक खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेच्या विमानवाहक युद्धनौकांची लष्करी ताकद काही देशांच्या लष्करापेक्षा अधिक आहे. एक विमानवाहू युद्धनौका हे एक स्वतंत्र लष्करच असते आणि ते जगात कुठेही पाठविता येत असल्याने अमेरिकेने आपले नौदल बळकट करण्याचा निर्णय अनेक वर्षांपूर्वी घेतला आणि त्यासाठी सर्वाधिक रकमेची तरतूद केली जाते. त्यापाठोपाठ हवाई दलासाठी तरतूद करण्यात येते आणि सर्वांत कमी लष्करासाठी तरतूद करण्यात येते.

**चीन आणि भारत** : चीन आणि भारत हे दोन देश मात्र आपल्या पायदळावर अधिक रक्कम खर्च करीत असतात. कारण चीन व भारताला आपल्या सीमेवर शत्रूचा मुलाबला करावा लागत आहे. चीन-रशिया यांच्या सीमेवर अनेकदा चकमकी होत आल्या आहेत. दोन्ही देशांची सीमा फार मोठी आहे. शिवाय चीनला भारतावरही वचक ठेवावा वाटतो. म्हणून चीनने पायदळ बळकट करण्यावर भर दिला आहे. आणि भारताला तर पाकिस्तान नावाचा जणू शाप लाभला आहे. त्यात चीन व आता बांगलादेश यांचीही भर पडली आहे. स्वाभाविकच भारतालाही पायदळावर मोठी रक्कम खर्च करावी लागते.

**भारताचा खर्च** : भारताने यावर्षीच्या आपल्या अर्थसंकल्पात सरंक्षणासाठी ६.८१ लाख कोटी एवढी तरतूद केली आहे. यापैकी १.८० लाख कोटी नवी, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी करण्यावर खर्च होणार आहेत. यातील ७५ टक्के राशी देशातंर्गत शस्त्रखरेदीवर खर्च केले जातील तर २५ टक्के राशी शस्त्र आयातीवर खर्च केले जातील. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा शस्त्रास्त्रे आयात करणारा देश आहे हे येथे उल्लेखनीय.

भारताला आपल्या लष्करी कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तिवेतन, दरमहा त्यांना दिला जाणारा शिधा यावर मोठी रक्कम खर्च करावी लागते. यासाठी ३ लाख ११ हजार कोटींची तरतूद करण्यात आली असून, ती मागील वर्षाच्या तुलनेत १०.२४ टक्के जादा आहे. या रकमेपैकी १ लाख १४ हजार कोटी रुपये शिधा खरेदी, इंधन खरेदी यावर खर्च होणार आहेत. सरंक्षण दलांव्यतिरिक्त भारतीय तटरक्षक दळ व सीमा सडक संघटन यांच्यासाठीही मोठी तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. देशाचा सागरी किनारा सुरक्षित करणाऱ्या तटरक्षक दळासाठी ९६७६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे तर सीमा भागातील रस्त्यांचे जाळे बळकट करण्यासाठी ७१४६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही राशी मागील वर्षाच्या तुलनेत ९.७४ टक्के जादा आहे.

**चीनचे उत्तर** : भारताने आपल्या अर्थसंकल्पात संरक्षणासाठी केलेली तरतूद पाहिल्यानंतरच चीनने आपल्या संरक्षण खर्चात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मानले जाते. अन्यथा आपली अर्थव्यवस्था कमजोर झाली असताना चीनकडून सरंक्षणावर एवढा मोठा खर्च केला जाईल असे अपेक्षित नव्हते.

**नाटोही आघाडीवर** : चीन, भारत या देशांनी आपापल्या संरक्षण खर्चात वाढ करण्याचा निर्णय घेतला असतानाच, नाटो देशांनीही आपल्या संरक्षण खर्चात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेने युक्रेनचा शस्त्रपुरवठा थांबविण्याचा निर्णय घेतल्यानंतर ब्रिटनने आपल्या सरंक्षण खर्चात प्रचंड वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ब्रिटनच्या पंतप्रधानांनी आपल्या देशाच्या संसदेत या निर्णयाची घोषणा केली असून, ब्रिटन पाठोपाठ युरोपातील काही देशांनी आपल्या संरक्षण खर्चात वाढ करण्याचा संकेत दिला आहे. दरम्यान, अमेरिकेने युक्रेनचा शस्त्रपुरवठा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला असला तरी राष्ट्रपती ट्रम्प नाटो देशांसाठी बेभरवशाचे ठरले असल्याने नाटो देश आपल्या संरक्षण खर्चात वाढ करण्याचा निर्णय बदलणार नाही असे मानले जाते.

**नाटोची वाढ** : २०१४ मध्ये नाटो संघटनेतील देश आपल्या संरक्षणावर एकूण २५० बिलियन डॉलर एवढी रक्कम खर्च करीत होते. २०१४ मध्ये रशियाने क्रिमीया या युक्रेन लगतच्या भागावर कब्जा केला. त्यानंतर नाटो देशांनी आपल्या संरक्षण खर्चात वाढ करणे सुरू केले आणि २०२४ मध्ये नाटो देशांनी आपल्या संरक्षणावर ४३० बिलियन डॉलर एवढा मोठा खर्च केला.

**स्पर्धा रशियाशी** : २०२२ मध्ये युक्रेनशी युद्ध सुरू केल्यापासून रशियाने आपल्या संरक्षण खर्चात दरवर्षी वाढ करणे सुरू केले आहे. आता तर रशियाने आपल्या संरक्षण खर्चात मागील वर्षीच्या तुलनेत ४० टक्के एवढी वाढ केली आहे. रशियाचा संरक्षणावरील खर्च १५० बिलियन डॉलर एवढा आहे. मात्र, रशिया-युक्रेन यांच्या क्रयशक्तीची तुलना करता तो ४६० बिलियन डॉलर एवढा होतो. म्हणजे रशिया नाटो देशांच्या एकूण खर्चापेक्षा जादा खर्च आपल्या संरक्षणावर करीत आहे.

**शस्त्रस्पर्धा जोरात** : अमेरिका, चीन व रशिया हे तीन देश जगातील आपल्या संरक्षणावर सर्वाधिक खर्च करणारे देश मानले जातात. वास्तविक या देशांना अन्य देशांपासून धोका नाही. उलट या देशांपासून इतर देशांना धोका आहे. अमेरिकेमुळे कॅनडा, डेन्मार्क, मेक्सिको, पनामा हे देश चिंतेत आहेत, चीनमुळे भारत, तैवान, फिलिपाईन्स, जपान या देशांना धोका जाणवत आहे तर रशियामुळे सारा युरोप चिंताग्रस्त आहे. अमेरिका, रशिया, चीन यांनी अचानक वाढविलेल्या संरक्षण खर्चाने भारतासह अनेक देशांना आपल्या जनकल्याणाच्या योजनांना काही प्रमाणात तरी कात्री लावावी लागली आहे आणि तो निधी संरक्षणाकडे वळवावा लागला आहे.

**नवी चाल** : अमेरिकेने आपल्या संरक्षण खर्चात वाढ केली असताना, भारताने आपल्याकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रखरेदी करावी अशी मागणीच केली आहे. आजवर अशा बाबी गोपनीय पद्धतीने केल्या जात होत्या. ट्रम्प प्रशासन मात्र सारे काही उघडपणे करीत आहे. अमेरिकेच्या या मागणीवर भारताने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# शिवरायांचे समर्थ..!

**आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थविवेका ।**
**येथे आळस करू नका । विवेकी हो ।**

समर्थ रामदास स्वामींनी मानवी जीवनाचा हेतू आणि सार्थकता यांचे स्पष्टीकरण करताना, राष्ट्रहिताला अनुकूल अशा व्यावहारिकतेकडे प्रकाशझोत टाकत समाजाला संसार आणि परमार्थ यांच्या समतोल विचारांचा उपदेश केला आहे. भगवंताचे केवळ नामस्मरण करणारी भक्ती समर्थांना मान्य नाही. उलट भगवंतावर श्रद्धा ठेवून त्यांच्या स्मरणाच्या सातत्याने आपला वाट्याला आलेल्या कामांत कधीही खंड पडता कामा नये, असेही ते बजावतात. याच दृष्टिकोनातून विवेकी वृत्तीचा त्यांनी आग्रह धरला आहे. या विवेकाला ते 'राजकारण' असे संबोधतात. दासबोधात याचे विस्तृत स्पष्टीकरण त्यांनी केले आहे. यातून समर्थांना अभिप्रेत असलेला राजकारण शब्दाचा अर्थ विस्ताराने स्पष्ट होतो. राजकारण हे एक शास्त्र आहे. राजकारण म्हणजे केवळ सत्तेची स्पर्धा नाही. राजकारण एक पायाभूत विचार असून तो प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी अनुभवसिद्ध अशी मंत्रसूत्रे असतात. त्यानुसार राजकारणातील हालचाली करायच्या असतात. राजकारण करणाऱ्याला शत्रू व मित्र असतात. दोघांशी वागण्याबाबत निश्चित सूत्रे व संकेत असतात. यांचा उपयोग शिवछत्रपतींनी अचूक केलेला दिसून येतो, असे अभ्यासपूर्ण विवेचन 'हिम्मतबहाद्दर' या नावाने परिचित परशुराम चव्हाण या शिवचरित्र आणि दासबोधाच्या ज्येष्ठ अभ्यासकाने केले आहे. दासबोधातील समर्थ रामदासस्वामींचे राजकारण निरूपण आणि शिवछत्रपती स्वराज्य निर्मितीच्या कार्यात प्रकट केलेले प्रत्यक्ष व्यवहारचातुर्य यांचे एकत्रित चिंतन केले तर या दोन्हींत साम्य आहे, असे लक्षात येते. एकात तत्त्व आहे, तर दुसऱ्यात जसाच्या तसा व्यवहार आहे. यातून त्यांना असा प्रश्न पडतो की, यातील तत्त्व आधी आणि त्याला अनुसरून व्यवहार केला गेला की, आधी व्यवहार आला मग त्यातून तत्त्व निर्माण झाले? या सर्वांचा निष्कर्ष असा की, स्वराज्य निर्मितीच्या पवित्र कार्यात अनुकूल ते मित्र आणि प्रतिकूल ते शत्रू, हे लक्षात ठेवून त्यांच्याशी वागताना जे व्यवहारचातुर्य वापरायचे आहे ते 'राजकारण' होय. या बाबतीत लोकसंग्रह करताना घ्यायची काळजी सांगताना समर्थ म्हणतात, 'एकांती चाळणा करावी । धारणा उदंड धरावी । नाना विचारणा करावी । अरिमित्रांची ॥' तसेच स्वराज्य निर्मिती कार्यात हातभार लावणाऱ्या मित्रांशी कसे वागायचे हे सांगून झाल्यावर शत्रूशी कसा व्यवहार करावा, याचाही स्पष्ट व परखड उपदेश समर्थ करतात,

**म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिसांचे माजले बंड ।**
**या कारणे अखंड । सावधान असावे ॥**
**देवद्रोही तितुके कुत्ते । मारोनी घालावे परते ।**
**देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाही ॥**
**हुंब्यासी हुंबा लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।**
**लौंदास पुढे करावा । दुसरा लौंद ॥**
**धटासी आणावा धट । उद्धटासी उद्धट ।**
**खटनटासी खटनट । अगत्य करी ॥**

मात्र हे सर्व करताना समर्थ म्हणतात, 'सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । परंतु येथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥' हे मुळीच विसरता कामा नये. शिवछत्रपतींचे क्षात्रतेज आणि समर्थांचे ब्राह्मतेज यांचा सुंदर मिलाफ होऊन त्यातूनच स्वराज्यनिर्मितीच्या ईश्वरी कार्याचे स्वप्न सत्यरूपात अस्तित्वात आले. हिम्मतबहाद्दर म्हणतात, श्री समर्थ शिवछत्रपतींचे राजगुरू होते, परंतु चंद्रगुप्तांचे गुरू असलेल्या चाणक्यांनी ज्याप्रमाणे मंत्रिपद घेऊन राज्यकारभार केला तसे समर्थांनी केलेले नाही किंवा भीष्म, अर्जुनाप्रमाणे सेनापतीत्वही केलेले नाही. परंतु राजकारणाच्या या दोनच कक्षा नाहीत. राजकारणात उपयोगी ठरणाऱ्या व प्रभाव गाजवणाऱ्या तीन शक्ती सांगितल्या आहेत. प्रवाह आणि उत्साह यांच्याइतकीच किंबहुना त्याहूनही अधिक श्रेष्ठ मंत्रशक्ती आहे. मंत्र म्हणजे मसलत, म्हणजेच राजकारण होय. मंत्रशक्तीचे सामर्थ्य तिच्या गुप्तपणातच वस्तुतः असते. समर्थ रामदास स्वामींचा गुप्तपणे राजकारण करण्यावर आणि आपल्या प्रचारकांनी गुप्तपणे साऱ्या कामाची उभारणी करण्यावर कटाक्ष होता, हे प्रसिद्धच आहे. मंत्रगुप्तीसंबंधी दक्षतेचे त्यांचे उद्गार असे,

**गुप्तरूपें केलें पाहिजे सर्वे । उदंड समुदाव करावे ।**
**परि गुप्तरूपे । पाहों जातां । कोठेंचि नाही ।**
**काय करितो तें कळेना । उदंड करी गुप्तरूपे ।**
**जातें स्थळ तें सांगेना । सांगितले तेथें तरी जायेना ।**
**आपुली स्थिती अनुमाना । येवोचि नेदी ॥**

शिवछत्रपतींच्या स्वराज्य विस्तारात प्रत्यक्षाप्रत्यक्ष सर्वतोपरी साह्य करणे व त्या ध्येयवादाने साऱ्या महाराष्ट्रीय जनतेची अंतःकरणे भारून टाकणे, हा या 'मंत्रमुक्ती'चा उद्देश होता.

९८८१७१७८२९

## कानोसा

# शिवाजी महाराजांची युद्धनीती

**अमोल पुसदकर**

कालयवनाने ज्यावेळेस मथुरेवर हल्ला केला त्यावेळेस भगवान श्रीकृष्णांनी विचार केला की केवळ मला पकडण्यासाठी मथुरेवर हे हल्ले होत आहेत यामुळे प्रजेला बराच त्रास आहे. त्यामुळे मीच काहीतरी केले पाहिजे. याच्या इतक्या मोठ्या सैन्याशी लढा देण्यापेक्षा कालयवनाला त्याच्या सैन्यापासून दूर नेले पाहिजे व त्यानंतर त्याला मारले पाहिजे असा विचार भगवान श्रीकृष्णांनी केला. असा विचार करून भगवान श्रीकृष्ण रणांगणातून पळू लागले. त्यांना पळताना पाहून कालयवन त्यांच्या मागे मागे धावू लागला. ज्या ठिकाणी भगवान मुचकुंद ऋषी झोपलेले होते त्या गुहेमध्ये भगवान श्रीकृष्ण शिरले. त्यांनी आपले उत्तरीय वस्त्र मुचकुंद ऋषींच्या अंगावर टाकले व स्वतः तेथेच लपून बसले. ज्यावेळेस कालयवन तेथे आला त्याला असे वाटले की श्रीकृष्ण वस्त्र पांघरूण झोपलेला आहे. त्यामुळे त्याने झोपलेल्या मुचकुंद ऋषींना जागे केले. मुचकुंद ऋषींना असे वरदान होते की जो कोणी तुम्हाला झोपेतून जागे करेल त्याच्यावर दृष्टी पडल्यावर तो भस्म होईल. झालेही तसेच कालयवन भस्म झाला व लढाई न करता सुद्धा भगवान श्रीकृष्णांचा विजय झाला.

गनिमाच्या म्हणजे शत्रूच्या मनातील हेतू ओळखून त्याप्रमाणे आपली नीती ठरविणे यालाच गनिमी कावा असे म्हणतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनामध्ये त्यांनी जी युद्धनीती वापरलेली आहे ती गनिमी कावा म्हणून प्रसिद्ध झालेली आहे. ज्या नीतीमध्ये कमी संख्येच्या सैन्याने मोठ्या सैन्यासोबत लढाई मांडून एक तर त्यांचा पूर्ण पराभव करणे किंवा त्यांना हानी पोहोचवून पळ काढणे या गोष्टी अंतर्भूत आहेत. याचाच उपयोग करून छत्रपती शिवाजी महाराजांनी वेगवेगळ्या बादशाहांसोबत लढाई मांडली व त्यांना जेरीस आणले. ही काही कोणत्या पुस्तकात लिहिलेली नीती नव्हती तर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः या नीतीचा अवलंब करून तिला यशस्वी बनविली व त्यांच्या नावाने ती ओळखली जाऊ लागली.

शिवाजी महाराजांचे स्वराज्य म्हणजे त्या वेळचे एक दोन जिल्हे होते. एवढ्या छोट्या भूभागामध्ये असलेलं हे स्वराज्य वेगवेगळ्या बादशाहांकडून वेढले गेलेले होते. यामध्ये बिजापूरचा आदिलशहा, कर्नाटकच्या बिदरचा बेरीदशहा, गोवळकोंडाचा कुतुबशहा, अहमदनगरचा निजामशहा, अचलपूरचा इमादशहा व दिल्लीचा औरंगजेब बादशाह तर होताच. याच औरंगजेब बादशहाने छत्रपती शिवाजी महाराजांना आग्र्याच्या किल्ल्यामध्ये कैद करून ठेवले होते. इतके मोठे बादशहा व त्यांची लाखोंची फौज असे असताना सुद्धा शिवाजी महाराजांनी आपल्या छोट्याशा सैन्याच्या भरोशावर या बादशाहांचा बीमोड कसा केला असेल, त्यांच्याशी टक्कर कशी घेतली असेल ही खूपच आश्चर्याची गोष्ट आहे.



शिवाजी महाराजांचा गनिमी कावा म्हणजे शत्रूला मारा, कापा व प्रसंग पडल्यास पळा अशा पद्धतीचा होता. पळा का बरं, तर बादशहाच्या हजारोंच्या फौजेसोबत कोण लढा देईल? तरीपण महासागरासारख्या पसरलेल्या मुघलांच्या सैन्यावर मूठभर मराठे हल्ले करायचे आणि त्यांच्या छावणीची नासधूस करून, जाळपोळ करून मिळेल त्याला, जमेल तेवढ्यांना मारून पसार व्हायचे. शिवाजी महाराजांच्या राज्यामध्ये खूप मोठा सपाट प्रदेश नव्हता तर सह्याद्री पर्वत होता. जंगल होते, दऱ्याखोऱ्या होत्या. त्या पर्वतांवर किल्ले बनलेले होते. अशाच किल्ल्यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकून घेतले. त्यांची डागडुजी केली व त्यांना लढण्यायोग्य बनविले. शिवाजी महाराजांना हे माहीत होते की आमचे किल्ले जर लढत राहिले तर वर्षानुवर्ष चालले जातील परंतु बादशहा आम्हाला जिंकू शकणार नाही. समाप्त करू शकणार नाही. आमचा एकच किल्ला फक्त एक वर्ष जरी लढू शकला तरी सुद्धा आमचे सर्व किल्ले जिंकायला बादशहाला खूप वर्ष लागतील. त्याचे सर्व आयुष्य यातच चालले जाईल. किती मोठा आणि खोल विचार आहे छत्रपती शिवाजी महाराजांचा!

असे म्हणतात की गनिमी कावा छत्रपती शिवाजी महाराजांना या सह्याद्री पर्वतानेच शिकविला होता. शत्रूवर अचानक हल्ला चढविणे, जाळपोळ करणे, नासधूस करणे त्याच्या सैन्याची मारकाट करणे, त्याची हिंमत खच्ची करणे, शत्रूचा जोर वाढत आहे असे लक्षात आल्यास पळ काढणे हाच गनिमी कावा होता. जेव्हा शिवाजी महाराज केवळ अठरा वर्षांचे होते व त्यांच्याजवळ फार फार तर फौज केवळ हजार बाराशेची होती त्यावेळेस आदिलशहाने शिवाजी महाराजांचे हे छोटेसे स्वराज्य संपविण्यासाठी आदिलशाहीचा मातब्बर सरदार फत्तेखान याला स्वराज्यावर चाल करून पाठविले. भरीस भर म्हणून आदिलशहाने छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे भोसले यांना सुद्धा कैद केले. म्हणजे इकडे वडील कैदेत सापडलेले व तिकडे स्वराज्यावर मोठी फौज घेऊन फत्तेखान चालून आलेला अशा संकटाचा तो काळ होता. अशा परिस्थितीत स्वराज्य संपले नसते तरच नवल होते. परंतु हिंमत हारेल तो शिवबा कसला.

मराठ्यांची सेना बेलसरच्या मार्गावर होती. जसे बेलसर जवळ आले तसे त्यांनी आपल्या घोड्यांची गती कमी केली. हळूहळू कुठलाही आवाज न करता ते फत्तेखानाच्या छावणीकडे सरकत होते. काही अंतर समोर गेल्यावर फत्तेखानाची छावणी त्यांना दिसू लागली. तेथून हळूहळू सर्वच लोक पांगू लागले. त्यांनी पाहता पाहता फत्तेखानाच्या छावणीला घेरून घेतले व त्यानंतर संकेत मिळतात एकच गर्जना उठली 'हर हर महादेव' आणि त्यानंतर मराठी फौज निद्रिस्त आणि बेसावध असलेल्या फत्तेखानाच्या फौजेवर तुटून पडली. अनेकांना आपले शस्त्र घ्यायला सुद्धा वेळ मिळाला नाही. शत्रूची लांडगेतोड सुरू होती. शत्रुसैन्य कापले जाऊ लागले. तेवढ्यात फत्तेखान उभा राहिला. त्याने ओरडून त्याच्या सैन्याला चेतविण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत काही सैनिक तलवारी घेऊन लढायला आले. परंतु मराठ्यांच्या वेगासमोर त्यांचा निभाव लागला नाही. तरीही फत्तेखानाचे सैन्य मोठे होते. त्यामुळे फत्तेखान उभा होता तेथे हळूहळू सैन्य जमा होऊ लागले. तोपर्यंत मराठ्यांनी माघार घ्यायला सुरुवात केली होती. लढता लढता ते माघार घेत होते. पाहता पाहता मराठे ज्या मार्गाने आले त्या मार्गाने ते परत निघाले. छोट्याशा सैन्याने फत्तेखानाची छावणी पार विस्कटून टाकली होती. शिवाजी महाराजांचे जीवन हा संपूर्ण विश्वाकरिता एक अभ्यासाचा मार्गदर्शनाचा विषय आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## गरज आहे प्रत्येक महिलेने जिजाऊ बनण्याची..!

आज कुठल्याही क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आघाडीवर आहेत. त्या फक्त घरच सांभाळत नाही, तर त्यांचं कार्यालयीन काम देखील तेवढ्याच चोख करतात. मुलांचा सांभाळ असू दे, त्यांचा अभ्यास असू दे, की इतर सगळ्या संसाराच्या गोष्टी सांभाळणे, तिला सहजरीत्या जमते आहे. वेळप्रसंगी आलेल्या संकटांवरसुद्धा मात करण्याची, तिच्यातील दुर्गाशक्ती जागृत होण्याची आवश्यकता आहे. महिलांचा आदर्श जिजाऊमाता, राणी लक्ष्मीबाई, राणी पद्मावती इत्यादी कर्तृत्ववान शूर स्त्रिया असायला हव्या. जेणेकरून प्रत्येक घरात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राणी लक्ष्मीबाईसारखे पुत्र किंवा पुत्री जन्माला यावेत. परंतु असे लक्षात येते की पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करता करता काही भारतीय स्त्रिया आपलीच संस्कृती विसरत आहेत. आईचे पाहून मुलीसुद्धा किंवा त्यांची मुलेसुद्धा संस्कृती जोपासत नाहीत. कुठल्याही आईने मुलीला



तयारी तिची करून घ्यायला हवी. त्यासाठी लाठी-काठी, कराटे, दंड, साखळी यासारखी उपकरणे वापरण्याची कला मुलींमध्ये येणे जरूरी आहे. आपण लव्ह-जिहादला बळी पडणार नाही, कोणी आपल्याला त्यांच्या फायद्याकरिता वापरत नाही ना? याचे सामान्यज्ञान देखील मुलींना आईने देणे अपेक्षित आहे. सक्षम भारत बनवायला महिलांचं खूप मोठं योगदान असणार आहे. मृगजळासारखे पैसा, प्रसिद्धी, सत्ता, अहंकार या क्षणभंगुर गोष्टींच्या मागे न लागता एक आई म्हणून, एक मुलगी म्हणून किंवा इतर कुठल्याही नात्यात देशाविषयी माझे जे कर्तव्य आहे ते मी पार पाडत आहे ना, याचा वेळोवेळी अभ्यास देखील महिलांचा होत असेल तर तर भारताला विश्वविजेता होण्यापासून कोणीही थांबवू शकणार नाही.

## वाचक पत्रे

### शिवाजी महाराज जयंती तिथीप्रमाणे करणार ना?

आता रामनवमी येईल. ती तिथीप्रमाणे चैत्र शुद्ध नवमीलाच करणार ना? हिंदू नववर्ष गुढीपाडवा सुद्धा चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढ्या उभारून साजरे करणार ना? गणेश उत्सव, जन्माष्टमी, हनुमानजन्म, दत्तजयंती, दसरा, दिवाळी, होळी, रंगपंचमी देखील तिथीप्रमाणेच करता ना? बुद्ध पौर्णिमा, महावीर जयंती, गुरुनानक जयंती, तुकाराम बीज, दासनवमी तिथीप्रमाणेच करता ना? संभाजी महाराज बलिदान दिन फाल्गुन अमावास्येलाच आठवतो ना? मग छत्रपती शिवाजी महाराज, हिंदवी स्वराज्याचे जनक, या हिंदुत्वाची मुख्य ओळख असलेल्या महापुरुषाची जयंती व पुण्यतिथी आंग्ल वा ग्रेगोरियन कॅलेंडरने साजरी करणे योग्य आहे का? आता १४४

ज्या श्रीशिवरायांनी स्वतःची शिवशके ही कालगणना सुरू केली, शिवरायांची राजमुद्रा बघा 'प्रतिपदश्चंद्र लेखैव वर्धिष्णू विश्ववंदिता'. ही देखील तिथींचाच उल्लेख करते ना? शिवाजीराजा माझा राम आहे, कृष्ण आहे, माझा देव आहे मग त्याची जयंती तिथीप्रमाणे का नसावी? अहो एवढेच काय संघसंस्थापक डॉ. हेडगेवार असोत की द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजी यांचे जन्मदिवस तिथीप्रमाणेच होतात ना? फाल्गुन वद्य तृतीया ही माझ्या शिवाजीराजांची जयंती की १९ फेब्रुवारी तुम्हीच ठरवा. मी तर फाल्गुन वद्य तृतीयेलाच शिवजयंती साजरी करणार. तुम्ही पण शिवजयंती तिथीप्रमाणेच करणार ना?

**रवी वाघमारे**/नागपूर

### नागपुरात बेवारस कुत्र्यांचा हैदोस

शुक्रवार, ७ मार्चच्या तरुण भारतात दीनदयालनगरात कुत्र्यांचा हैदोस अशी बातमी वाचली. दुचाकीवरून जाणाऱ्या

असता वैद्यकीय उपचार फार त्रासदायक व कठीणच असतात आणि उपचार बरोबर झाले नाही तर कुत्रा चावलेल्या व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो. बेवारस कुत्र्यांचा हा त्रास केवळ दीनदयालनगरात नसून नागपुरात सर्वच भागात आहे. बेवारस कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त मनपाकडून अपेक्षित आहे. परदेशात असे बेवारस कुत्रे दिसत नाहीत. तिथे एखाद्या कुत्र्याने कोणत्याही नागरिकाला चावा घेतला, तर त्या कुत्र्याच्या मालकाला कोर्टाद्वार मोठ्या प्रमाणात नुकसान भरपाई द्यावी लागते. सबब प्रत्येक कुत्र्याच्या गळ्यात पट्टा असणे व कुत्रा पाळण्यासाठी मनपाचा परवाना असणे अनिवार्य असावे. अशाप्रकारे नागपुरात एकही बेवारस कुत्रा दिसणार नाही, हे मनपाकडून अपेक्षित आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जीवनात पुढे जाण्यासाठी दृष्टी असली पाहिजे –जल संधारण अधिकारी मानसी जोशी

## वडिलांचे छत्र हरवलेल्या मानसीने घेतली झेप, पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने गुणी कर्तृत्वाचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ मार्च**

गुणगौरव हा प्रेरणा व ऊर्जा देण्यासाठी असतो शैक्षणिक गुणवत्तेतूनच जीवनाचा विकास होतो सर्वांगीण विकास साधून जीवनात पुढे जाण्यासाठी दृष्टी असावी लागते असे मत धाराशिव येथील जलसंधारण विभागातील अधिकारी मानसी जोशी यांनी व्यक्त केले.

जलसंधारण विभागात वर्ग दोन अधिकारीपदी मानसी जोशी यांची निवड झाल्याबद्दल येथील पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने मानसी जोशी यांचा गौरव करण्यात आला त्यावेळी सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या. आपल्या मार्ग दर्शनपर मनोगतात त्यांनी सांगितले की पालकांनी पाल्यासोबत गुणवत्ते संबंधी चर्चा केली पाहिजे आणि विद्यार्थ्यांनी देखील जिद्द, चिकाटीने शिक्षण घेतल्यास घवघवीत यश प्राप्त होते समाजाच्या चांगुलपणासाठी योगदान देणाऱ्या कार्य कतृत्वाचा गौरव करण्यासाठी पेशवा प्रतिष्ठान सारख्या संस्था आहेतच ही काळ्या दगडावरील पांढरी रेष आहे कठोर परिश्रम विनम्रता आणि मोबाईल पासून दूर राहणे ह्या गोष्टी घेतल्यातर यश आपल्या जवळच आहे असे सांगून त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या अंबाजोगाईच्या योगेश्वरी शिक्षण संस्थेत आपले विद्यालयीन, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाले त्याबरोबरच अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनाच्या सरळ सेवेच्या भरतीप्रमाणे मराठवाड्यातच धाराशिव येथे जलसंधारण अधिकारी वर्ग दोन पदी आपली निवड झाली आणि मी माझी आई श्रीमती सुरेखा जोशी हिचे स्वप्न पुर्ण केले आपण लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली असल्याचे मानसी जोशी यांनी सांगितले.

यावेळी पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत मानसी जोशी यांचा गौरव करण्यात आला



या प्रसंगी प्रतीक्षा जोशी,रोहिणी जड,कल्याणी कुलकर्णी,अनिता औटी, वर्षा मिरगे,प्रणिता पोखरीकर,प्रणिता सेलमोकर, सुरेखा जोशी,उज्वला गोस्वामी अविनाश जोशी, रमेश कुलकर्णी, पत्रकार प्रशांत बर्दापूरकर, राहूल देशपांडे,डॉ.महेश अकोलकर, पदमाकर सेलमोकर, दुर्गादास दामोशन, डॉ.प्रविण जोशी,विनायक गोस्वामी, संकेत तोरंबेकर, किरण गोस्वामी, केदार दामोशन, शिशिर हिरळकर, सराफ आदी उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यात सुसज्ज विमानतळ उभारणार

## उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची विधिमंडळात घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ मार्च**

बीड जिल्ह्यात विमानतळ उभारून जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधींनी केली असून याबाबतचा प्रस्ताव बीड जिल्हा प्रशासनाने संबंधित यंत्रणांना सादर केलेला आहे. बीड जिल्ह्यात सुसज्ज असे विमानतळ उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, या कामाला आता गती देण्यात येणार असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी विधिमंडळात घोषित केले.

बीड जिल्हा प्रशासनाने मागील काळात याबाबतचा प्रस्ताव केंद्र व राज्य शासनास संबंधित यंत्रणांकडे सादर केलेला असून, किमान तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारण्याच्या दृष्टीने सुसज्ज जागा, केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून भूसंपादन इत्यादी प्रक्रिया गतीने पूर्ण करून, विमानतळ उभारणीचे काम वेगाने केले जाईल असेही अजित दादा पवार आपल्या भाषणात पुढे बोलताना म्हणाले.

बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी या घोषणेचे स्वागत केले असून, बीड जिल्हावासियांचे रेल्वे पाठोपाठ आता सुसज्ज अशा विमानतळाचेही स्वप्न पूर्ण होणार असल्याचा आपल्याला मनापासून आनंद आहे. हा निर्णय म्हणजे केवळ बीड साठीच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यासाठी मोठी उपलब्धी असून, बीड जिल्ह्याच्या औद्योगिक, कृषी आणि व्यावसायिक प्रगतीसाठी हा महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरणार आहे, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

धनंजय मुंडे हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना याबाबतचा मूळ प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने केंद्र व राज्य सरकारकडे पाठवला होता. बीड जिल्ह्याच्या रेल्वे पाठोपाठ आता विमानतळाचे ही स्वप्न पूर्ण होणार असून गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आपल्या अर्थसंकल्पावरील भाषणात देखील विमानतळ उभारण्याची मागणी केली होती. विजयसिंह पंडित यांच्यासह ही मागणी वेळोवेळी केलेल्या सर्वच लोकप्रतिनिधींचे हे यश मानावे लागेल असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

# बचतगट जिल्हास्तरीय प्रदर्शन-विक्रीच्या नवतेजस्विनी महोत्सवा मध्ये तेरा लाख साठ हजार रुपयांची उलाढाल



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ मार्च**

महिला व बाल विकास विभाग अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन व जागतिक महिला दिनानिमित्ताने नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पाच्या अमलबजावणीसाठी दि. १० ते १२ मार्च २०२५ दरम्यान छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण या ठिकाणी स्वयंसहाय्य महिला बचतगट उत्पादित वस्तू/मालाचे जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री करिता नवतेजस्विनी महोत्सव

२०२५ मध्ये जिल्ह्यातील विविध प्रकारचे ५२ स्टॉल ने सहभाग घेतला आहे. या नवतेजस्विनी महोत्सवामध्ये गावरान डाळी , स्वादिष्ट मसाले, रुचकर पापड, कुरडई , शेवय्या, लोणचे, कलिंगड, लिंबू शरबत विविध पदार्थ, गावरान अंडी, कापडी पिशवी, रेडीमेड शर्ट व ब्लाउज, इमिटेशन ज्वेलरी, दही धपाटे, व्हेज खानावळ इत्यादीची सुमारे तेरा लाख साठ हजार रुपयांची उलाढाल झाली. यामुळे बचतगटांच्या महिलाना मार्केटिंग साठी हक्काचे व्यासपीठ माविम ने उपलब्ध करून देण्यात आले. या नव तेजस्विनी महोत्सवात स्टॉल धारकांना मोठा फायदा झाला आहे. यानंतर २० ते २५ मार्च २०२५ दरम्यान नवी मुंबई वाशी येथे राज्यस्तरीय प्रदर्शन व विक्री चे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती माविम जिल्हा समन्वय अधिकारी एस बी चिंचोलीकर यांनी दिली आहे.



मस्साजोग येथे धनंजय देशमुख यांची भेट घेतली. नामच्या सांगण्यावरून मी नदी, नाल्यांची पाहणी केली. मस्साजोग येथे नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून जवळपास तीन नदी खोलीकरण, पाणी अडविण्यासाठी मोठे काम करण्यासाठी चर्चा केली. येत्या काही दिवसात हे काम चालू होईल. स्व. संतोष देशमुख यांना ही श्रध्दांजली ठरेल. या कामात मी स्वतः पुढाकार घेणार आहे. पाहणी दरम्यान भागवत कदम, जालिंदर देशमुख,पंजाबराव देशमुख, गणपत साहेबराव मोरे, शिरीष सज्जनराव देशमुख, महादेव किसनराव उंद्रे, तुषार संभाजीराव देशमुख, सोपानराव देशमुख, सुदर्शन देशमुख, संदीपान थोरात, डॉ. भगीरथ बांड यांच्यासह अन्य हजर होते.

# यशवंत नगर येथील सिद्धेश्वर महादेव प्राणप्रतिष्ठा द्वितीय वर्धापन दिन व गायत्री यज्ञ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ मार्च**

येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर येथे गेल्या दोन वर्षापूर्वी मंदिराचे अध्यक्ष अ‍ॅड.मंगेश पोकळे सर यांच्या मार्गदर्शनाने व परदेशी परिवारातर्फे शिवलिंगाची स्थापना करण्यात आली होती. आज दि.१०/३/२५ अमलकी एकादशी च्या पावन पर्वावर द्वितीय वर्धापन दिनानिमित्त श्रीराम परदेशी व,दत्तात्रेय परदेशी यांनी शिवलिंगाचा रुद्राभिषेक श्री श्री श्री १००८ महामंडलेश्वर महास्वामी शिवरुद्रानंद सरस्वती महाराज यांच्या शुभहस्ते शिवलिंगाचा रुद्राभिषेक करण्यात आला.गायत्री परिवार बीड यांनी अमलीकी एकादशीच्या निमित्ताने गायत्री महायज्ञाचे आयोजन केले होते.



या यज्ञाचे यजमान श्रीराम परदेशी,दत्तात्रय परदेशी, या परिवाराने स्थापन केलेल्या शिवाची अहोरात्र सेवा करत आहेत. व त्यामुळे पंचक्रोशीतील शिव भाविक सुद्धा त्याचा लाभ घेत आहेत.या सर्व कार्यक्रमाला ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे बीड जिल्हा समन्वयक गायत्री परिवार. हनुमानदास बियाणी, साईनाथ दुधाळ, दुधाळ ताई,पोकळे ताई. पोकळे काकू, महावीर बोरा ,मेढे, तुकाराम पंत जोशी ,चाटे साहेब दैनिक चंपावती पत्राचे महादेव नाना साळुंके ,म्हेत्रे काका. भराटे, विलास लेंबे, मुकुंद भुत्पले, गायकवाड साहेब, रत्नपारखी काका, मुंडे ताई, बाळू काका जायभाये, यांच्यासह यशवंत नगर व परिसरातील असंख्य भाविक भक्त या कार्यक्रमाला उपस्थित होते. यज्ञा नंतर सर्वांनी फराळाचा आस्वाद घेतला.

# आदित्य पॉलीटेक्निकच्या ४३ विद्यार्थ्यांनी दिली नाशिकच्या सुमागो इन्फोटेकला भेट

## औद्योगिक भेट : वेब डेव्हलपमेंट, सॉफ्टवेअर, मोबाईल, प्लिकेशन, युआय युएक्स डिझाइन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल मार्केटिंगची मिळवली माहिती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ मार्च**

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षीकांधून मिळालेली माहिती त्यांच्या कायम स्मरणात राहते आणि ती त्यांच्या करिअरच्या दृष्टीने महत्वाची असल्याने आदित्य अभियांत्रिकीच्या ६ प्राध्यापकांनी ४३ विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट थेट नाशिकच्या सुमागो इन्फोटेक प्रा.ली. येथे दिली. तेथे विद्यार्थ्यांनी वेब डेव्हलपमेंट, सॉफ्टवेअर, मोबाईल, प्लिकेशन, युआय युएक्स डिझाइन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल मार्केटिंगसह उद्योगातील व्यावसायिक वातावरणाचा अनुभव प्रत्यक्ष घेतला.

आदित्य शिक्षण संस्थेतील प्रत्येक विद्यार्थी परिपूर्ण होऊन बाहेर पडला पाहिजे यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा हे नेहमीच प्रयत्न करत असून प्राचार्य, प्राध्यापकांना ते वेळोवेळी तशा सुचना देतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य शिक्षण संस्थेत विविध उपक्रम राबवले जातात. नुकतीच आदित्य



पॉलिटेक्निकच्या कंप्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सुमागो इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड, नाशिक या आयटी सॉफ्टवेअर कंपनीला औद्योगिक भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना वेब डेव्हलपमेंट, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, मोबाईल प्लिकेशन डेव्हलपमेंट, णख/णद डिझाइन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल मार्केटिंग आणि फुल स्टॅक डेव्हलपमेंट या विषयांवर सखोल माहिती मिळाली. उद्योगातील व्यावसायिक वातावरणाचा अनुभव घेतल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ज्ञानात भर पडली. त्याच बरोबर त्यांना प्रत्यक्ष उद्योगातील कौशल्य यामधील अंतर समजले. ही माहिती त्यांना भविष्यातील नोकरी आणि उद्योजकतेच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांसह विभाग प्रमुख प्रा. सलीम शेख , प्रा. अंकुर कांबळे, प्रा. सूरज शिंदे, प्रा. आकांक्षा सवासे, प्रा. पूजा जाधव, प्रा. शिवानी जाधव, प्रा.सुरज शिंदे हे प्राध्यापक सोबत होते. आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली ही औद्योगिक भेट यशस्वीरित्या पार पडली.

### आदित्य पॉलिटेक्निक आणि सुमागो इन्फोटेक यांच्यात झाला सामंजस्य करार

विद्यार्थ्यांच्या औद्योगिक भेटीतील महत्त्वाचा क्षण म्हणजे आदित्य पॉलिटेक्निक आणि सुमागो इन्फोटेक यांच्यातील सामंजस्य करार (चेण) झाला. यामुळे विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप, कार्यशाळा आणि प्रकल्पाधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहे. आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

सुमागो इन्फोटेकच्या बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर दीप्ती पवार यांच्याकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सुमागो इन्फोटेकच्या बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर दीप्ती पवार आणि त्यांच्या टीमने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत, वेब आणि मोबाईल प्लिकेशन डेव्हलपमेंट च्या प्रक्रिया, सॉफ्टवेअर क्षेत्रातील संधी, सायबर सिक्युरिटी, तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि फुल स्टॅक डेव्हलपमेंट चे महत्व यावर सविस्तर माहिती दिली. याशिवाय, स्टार्टअप कंपन्यांमध्ये संधी, इंडस्ट्रीमध्ये आवश्यक कौशल्ये आणि भविष्यातील तंत्रज्ञान ट्रेंड्स याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कंपनीच्या वर्किंग स्ट्रक्चर ची माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांना उद्योगातील कार्यपद्धती समजली.

# श्री बंकटस्वामी महाविद्यालयात संत साहित्यामध्ये संत तुकाराम महाराजांचे योगदान या विषयावर व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ मार्च**

दिनांक १७ मार्च २०२५ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने संत तुकाराम महाराज यांचे संत साहित्यातील योगदान या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभागाचे प्राध्यापक नितीन चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे यांचीही उपस्थिती होती.



प्रमुख वक्ते प्रा.नितीन चव्हाण यांनी संत तुकाराम महाराजांचे जनसामान्यांबद्दलचे विचार स्पष्ट करताना त्यांच्या अभंगांमधून विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा, दैववाद, कर्मवाद आणि दारिद्र्य यांसारख्या सामाजिक समस्यांवर कसे भाष्य केले आहे, हे सांगितले. बुडती हे जन न देखवे डोळा, येतो कळवळा म्हनोनी या अभंगाच्या संदर्भाने त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या समाजहिताच्या भूमिकेवर प्रकाश टाकला.संत तुकाराम महाराजांनी शिक्षण, वाचन, चिंतन, अभ्यास आणि गुरु-शिष्य परंपरेबाबत मांडलेले विचारही या व्याख्यानात मांडण्यात आले. समाजाने विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन ठेवावा आणि अंधश्रद्धा नष्ट व्हाव्यात, यासाठी संत तुकाराम महाराजांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख त्यांनी केला. तसेच, वाणिज्य, व्यापार, शेती आणि सावकारी यासंबंधीचे त्यांचे अनुभव आणि त्यातून त्यांनी समाजाला दिलेली दिशा यावरही त्यांनी सविस्तर विवेचन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे यांनी मराठी विभागाच्या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, ज्या संताच्या नावाने हे महाविद्यालय उभे आहे, त्या संतांच्या विचारांचा प्रसार हा या उपक्रमाच्या माध्यमातून होत आहे. तुकाराम गाथा हा जगातील एकमेव असा ग्रंथ आहे, ज्याची आजही चांदीच्या पालखीतून मिरवणूक निघते. ही गाथा प्रत्येकाने वाचावी, आत्मसात करावी आणि त्यानुसार आपले जीवन मार्गी लावावे, असे याप्रसंगी मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे प्रा. डॉ. महादेव जगताप यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजू काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कनिष्ठ विभागाचे प्राध्यापक प्रा. राजाभाऊ नागरगोजे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### अखेर सेलू मुख्याधिकाऱ्यांद्वारे हमीपत्र सादर - पाणी पुरवठा सुरळीत होणार : ३१ मार्च पर्यंत मुदत

**सेलू,/प्रतिनिधी :** लोअर दुधना सिंचन प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांना ३१ मार्च २०२५ पर्यंत टप्प्या टप्प्याने १५ लाख रुपये थकबाकी रक्कम भरावयाचे हमीपत्र सेलू नगर पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी दिले .

सेलू नगरपालिकेकडील पाणी पुरवठ्याबद्दलची रक्कम थकल्याबद्दल लोअर दुधना प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांनी सेलू शहराचा पाणी पुरवठा खंडीत . त्यामुळे सेलू वासीयांना कृत्रीम पाणी टंचाईस सामोरे जावे लागले. सणा सुदीच्या काळात पाणी पुरवठा खंडीत होवू लागल्याने नागरिक संतापले. , नगर पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी कार्यकारी अभियंत्यांना ३१ मार्च पर्यंत टप्प्या टप्प्याने १५ लाख रुपयांची थकबाकी भरावयाचे हमीपत्र दिले. त्यामुळे कार्यकारी अभियंत्यांनी पाणी पुरवठा सुरळीत करण्याचा आदेश बजावला . त्याप्रमाणे शनिवारी सायंकाळी ६ वाजता सेलू शहराचा पाणी पुरवठा सुरळीत होणार . , ३१ मार्च पर्यंत हमीपत्र देवूनसुध्दा १५ लाख रुपयांची थकबाकी अदा न केल्यास पुन्हा पाणी पुरवठा खंडीत होवू शकतो, असे पाटबंधारे खात्याच्या अभियंत्यांनी स्पष्टपणे नमूद केले .

### मद्यप्राशन करीत वाहने चालविणाऱ्या १८६ जणांविरुध्द गुन्हे दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** रंगमंचमी सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलिस दलाने पेट्रोलिंग व नाकाबंदी दरम्यान तपासणी करत एकूण १८६ प्रकरणामध्ये मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांविरोधात गुन्हे दाखल केले .

मद्यप्राशन करून वाहन चालविल्यामूळे मोठमोठे अपघात होवून जिवितांचे व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता असते. याची दखल घेत जिवित व मालवत्तेचे नुकसान टाळता यावे म्हणून पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांनी परभणी जिल्ह्यात मोठा बंदोबस्त नेमून संबंध जिल्हाभर पोलीस पेट्रोलिंग व ठिकठिकाणी नाकाबंदी लावून मद्यप्राशन करून वाहन चालविणे व इतर वाहतून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यांसंदर्भात आदेश व सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने शुक्रवारी (दि.१४) पोलिसांनी पेट्रोलिंग व नाकाबंदी दरम्यान तपासणी करत जिल्ह्यात एकूण १८६ प्रकरणामध्ये मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांविरोधात मो.वा.का. कलम १८५ नुसार गुन्हे दाखल केले .

### माहेश्वरी समाजाद्वारे आयोजित 'डुंडन' कार्यक्रम उत्साहात

**सेलू,/प्रतिनिधी:** होळी निमित्त येथील बालाजी मंदिरात गुरुवार १३ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता माहेश्वरी समाजाच्या वतीने आयोजित डुंडन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रतिवर्षा प्रमाणे फाल्गुन पौर्णिमेला हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला . चि. अथर्व गौरव बिहाणी, अवदेश संकेत तोष्णीवाल, यक्षित विणय सोनी, अंश शैलेश मालाणी, नमन भवानीशंकर जोशी, क्रिशिव विजय सोमाणी, चिराग तेजस परताणी, कु. प्रिशा शुभम काबरा, देविका राधाकिशन मिश्रा, तिशा रमणकुमार दोडिया, उर्जा बासुजी तोतला अशा एकुण आकरा बालकांचा समावेश असलेला डूंडन कार्यक्रमात समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले .

भविष्य पुराणातील कथेनुसार राजारघूच्या राज्यात डुंडा नावाच्या राक्षसीतीने निर्माण केलेल्या दहशतीमुळे राज्यातील लहाणमुळे आजारी पडत असत. वशिष्ट ऋषींच्या सल्ल्याने लोकांनी अग्नी प्रज्वलीत करून जोरदार आवाजात वाद्यवाजवून खेळ खेळल्यामुळे राक्षसीणी पळूण गेली त्यामुळे लहाण मुलांच्यामनातील भिती घालवण्यासाठी आई, काका, आजोबा यांच्या मांडीवर लहाण मुलांना बसवून त्याभोवती वाद्यवाजवून खेळ खेळल्यास लहान मुलांच्या मनातील भिती नष्ट होते, अशी परंपरा . , या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मानस भजनी मंडळी, राजस्थानी महिला मंडळ व बालाजी मंदिर ट्रस्टच्या सर्व पदाधिकारी व ट्रस्टींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला समाज बांधवांची व महिलांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

### शिवीमुक्त व व्यसनमुक्त होळी साजरी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरातील जूना पेडगाव रस्त्यावरील प्रभाग क्रमांक १० मधील युवकांनी शिवीमुक्त व व्यसनमुक्त होळी व रंगपंचमी साजरी केली.

जूना पेडगाव रस्त्यावरील सहकार नगर, प्रभावती नगर, मिसर नगर, महालक्ष्मी नगर या भागातील या युवकांनी यंदा होळी व धूळीवंदन हे दोन्ही सण आपआपसात एकमेकांच्या आई व बहिणीवर शिवीगाळ न करता शिवीमुक्त व व्यसनमुक्त साजरे करण्याचा संकल्प सोडला. त्याप्रमाणे या दोन्ही दिवशी येथील शेकडो युवकांनी होळी व रंगपंचमी मोठ्या जल्लोषात व उत्साहात साजरी करतेवेळी शिवीमुक्त व व्यसनमुक्त संकल्पना राबवली. रुपेश स्वामी, मंगेश सामाले, अंकुश नाईक, श्रीहरी महिंद्रकर, मयुर देशपांडे, आनंद जोशी यांच्यासह इतर युवकांनी यासाठी पाठपुरावा . , या युवकांनी रंगपंचमीच्या दिवशी भारत माता की जय, हर हर महादेव, यळकोळ यळकोट जय मल्हार असा जयघोष करीत या भागातून फेरी काढली व त्याद्वारे रंगपंचमी व होळीच्या नागरीकांना शुभेच्छा दिल्या.

### तपत्या उन्हात उजेर कुरेशी चा पहिला रोजा संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी :** मुस्लिम धर्मीयांचा पवित्र रमजान महिना भर उन्हाळ्यात सुरू



झालेले आहे.शहरातील माजी नगरसेवक, शेख फ रोज मुसा कुरेशी यांचा सहा वर्षीय मुलगा उजेर कुरेशी यांनी दि.१७ मार्च रोजी सुर्यादयापुर्वीपासून ते दिवसभर कोणतेही अन्न पाणी न खाता तब्बल १२ ते १४ तासांचा उपवास (रोज) पुर्ण करत आपल्या आयुष्यातील पहिला पवित्र रमजान चा रोजा पुर्ण केला त्यास आजोबा मुसा कुरेशी, वडील फेरोज कुरेशी, सर्व कुरेशी बिरादारी,मित्र मंडळांनी शुभेच्छा देत अभिनंदन कौतुक केले

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❏ दैनिक ❏ वेबसाईट ❏ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# महिलांनी स्वतःची शक्ती ओळखली पाहिजे- डॉ.सारिका बडे यांचे प्रतिपादन

**परभणी,/प्रतिनिधी:-** महिलांनी स्वतःची शक्ती ओळखलीपाहिजेडॉ.सारिकाबडे आर.पी.हॉस्पिटलमध्ये सर्व रोगनिदान तपासणी शिबिरास प्रतिसाद परभणी : महिला सर्वच क्षेत्रांमध्ये कार्यरत . परंतु, असे असले तरी महिलांकडून स्वतःचे आरोग्य त्र दुर्लक्षित केले जाते. यामुळे महिलांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. महिलांनी स्वतःची शक्ती ओळखून पुढील वाटचाल केल्यास केवळ घरच नव्हे तर देश सुद्धा महिला समर्थपणे चालवू शकतात, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हा शल्यचकित्सक डॉ. सारिका बडे यांनी केले.



जागतिक महिला दिनानिमित्त परभणी मेडिकल कॉलेज व आर.पी.हॉस्पिटल आणि रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्यावतीने रविवारी महिलांसाठी सर्व रोगनिदान तपासणी व उपचार शिबिर आयोजित केले . याप्रसंगी व्यासपीठावर अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सारिका बडे, विधीज्ञ तथा सामाजिक कार्यकर्त्या माधुरी क्षीरसागर, डॉ. संप्रीया पाटील, वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमीर तडवी मनीषा गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित शिबिराचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. आमदार डॉ. राहुल ट यांच्या संकल्पनेतून परभणी मेडिकल कॉलेज येथे सातत्याने विविध प्रकारच्या आरोग्य शिबिराच्या आयोजन केले जाते. यावेळी माधुरी क्षीरसागर म्हणाल्या, महिला आणि पुरुषांमध्ये समानता आणणे आवश्यक . महिला मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या स्वस्थ असणे गरजेचे असून विविध प्रकारच्या अंधश्रद्धा तसेच स्त्रियांना दिले जाणारे दुय्यम स्थान यामुळे महिलांमध्ये अनेक प्रश्न निर्माण होतात. आर.पी.हॉस्पिटल मेडिकल कॉलेजच्या या उपक्रमामुळे अनेक महिलांना त्यांच्या आरोग्यविषयक समस्यावर उपचार मिळणे सोपे झाले. यावेळी डॉ.संप्रिया ट म्हणाल्या, आर.पी.हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज येथे महिलांसाठी विविध प्रकारच्या तपासणी उपचार उपलब्ध . आमदार डॉ. राहुल ट यांच्या संकल्पनेतून प्रत्येकासाठी सुसज्ज सुविधा या ठिकाणी निर्माण करून दिल्या . महिलांनी स्वतः चे आरोग्य सांभाळून कुटुंब आणि इतर सर्व व्यवसाय नोकरीला प्राधान्य देणे आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या.

४८० महिलांची झाली तपासणी

महिला दिनानिमित्त सर्व रोगनिदान आरोग्य तपासणी शिबिरामध्ये रक्तदाब तपासणी, सीबीसी, रक्तातील सर्व तपासण्या, अस्थिरोग, नेत्र तपासणी, दंत तपासणी, फिजिओथेरपी या सर्व तपासणी मोफत करण्यात आल्या. या शिबिरात जवळपास ४८० महिलांची ही तपासणी झाली.

## बौद्धगया येथील बौद्धगया महाविहार ब्रह्मनाच्या ताब्यातुन मुक्त करुन बौद्धांच्या ताब्यात द्या... भंदत महानंद



**रामप्रसाद कंठाळे**
**जितूर,/प्रतिनिधी-** बौद्धगया येथील बौद्धगया महाविहार ब्रह्मनाच्या ताब्यातुन मुक्त करुन बौद्धांच्या ताब्यात द्या... भंदत महानंद असे प्रतिपादन केले.

जिंतुर - आज दि ११/०३/२०२५ रोजी बौद्धगया येथील बौद्धगया महाबोधि महाविहार ब्रह्मनाच्या ताब्यातुन मुक्त करुन बौद्धांच्या ताब्यात द्यावे म्हणून भारतातील व संपूर्ण विश्वातील पुजनीय भिक्खु संघ व भिक्खुणी संघ व सर्व राज्यातील बौद्ध अनुयायी महाबोधि महाविहार बुद्धगया येथे उपोषणाला बसलेले आहेत.महाबोधी महाविहार ब्रह्मनाच्या ताब्यातुन मुक्त करण्यासाठी हे आंदोलन सशक्त करण्यासाठी म्हणून जिंतुर तालुक्यातील बौद्ध भिक्खु भारतीय बौद्ध महासभा शाखा जिंतुर आंबेडकरी चळवळीतील सर्व संघटना यांच्या वतीने तहसील कार्यालय जिंतुर समोर एक दिवसीय भव्य धरणे आंदोलन करण्यात आले.जिंतुर तालुक्यातील बौद्ध भिक्खु व आंबेडकरी चळवळीतील सर्व आंबेडकरी संघटना यांनी मा.प्रशांत भाऊ राखे तहसीलदार साहेब जिंतुर यांच्या मार्फत महामहीम मा.राष्ट्रपती श्रिमती. धौपदी मृमू व मा.नरेंद्रजी मोदी साहेब पंतप्रधान यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनातील प्रमुख मागण्या बी.टी.एम.सी.ॲक्ट पुर्णपणे रद्द करावा व महाबोधि महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे म्हणून निवेदन देण्यात आले उपस्थित पु.भिक्खु संघरत्न,पु. भिक्खु महानंद, पु.भिक्खु आर्याजी धम्ममाताऑड.रमेश भडगळ,विकास आण्णा मोरे , राजेन्द्र घनसावंत,महेंद्र बनसोडे,आनंद राव वाकळे,मोहन घनसावंत ,सतिश वाकळे,शरद चव्हाण ,कैलास खिल्लारे ,सुनिता ताई ट ,आशाताई वाकळे ,आशाताई खिल्लारे आदी बौद्ध समाज बांधव सहभागी झाले होते

## जिंतुर तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील शरद चव्हाण यांना समाज रत्न पुरस्कार



**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ता शरद चव्हाण यांना समाज रत्न पुरस्कार जाहिर झाल्यामुळे तालुक्यात यांचे अभिनंदन करण्यात येते आहे जिंतुर तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील अग्रेसर नाव म्हणजे शरद चव्हाण ग्रामीण भागातुन मौजे, वरुड नृसिंह खेड्यागावातुन आंबेडकरी चळवळीत वयाच्या आठरव्या वर्षी सुरुवात केली बसपा चा एक कॅडेरबेस कार्यकर्ता वरुड नृसिंह गाव आपल्या कामातुन जिंतुर शहर व ग्रामीण भागात ओळख निर्माण केली जिंतुर शहर तालुक्यातील खेडोपाड्यामध्ये श्रामनेर शिबीर,धम्मपरिषद भिम जयंती निम्मित धम्मकार्य म्हणून काम केले,तसेच मौजे,आकोली येथे स्वाभिमानी बौद्ध धम्म परिषद आयोजन करीत समाजामध्ये एक स्वाभिमानी निष्ठावान कार्यकर्ता म्हणून ओळख निर्माण करून चळवळीत सक्रिय कामकरत तालुक्यातील गोरगरीब कष्टकारी शेतकरी शेतमजुर दलित पीडीत शोषीत यांचा आवाज बनुन जिंतुर तालुक्यात आंदोलन,मोर्चा,धरणे आंदोलन करुन समाजाला न्याय देण्याचे काम केले तसेच पाच ते सहा वर्ष झाले जिंतुर शहरात महामानवांच्या जयंती निम्मित विविध संस्कृति कार्यक्रम तसेच प्रबोधनात्मक कार्यक्रम घेतले जाते असे अनेक सामाजिक उपक्रम राबवत असतात याच कामाची दखल घेऊन दि.३० मार्च २०२५ रोजी मौजे,पारेगाव जि.जालना येथे त्यांना समाज रत्न पुरस्काराने सन्मानीत केले जाणार आहे त्यामुळे शरद चव्हाण यांचे जिंतुर तालुक्यात चळवळीतील कार्यकर्ते त्यांचे अभिनंदन करत आहेत

### पाण्याचा काटकसरीने वापर करावा- बोर्डीकर :

परभणी,दि.१७(प्रतिनिधी) : यावर्षी तालुक्यात पुरेसा पाऊस पडला तरी वाढत्या उष्णतेमुळे पाणवठे, विहिरी, जलकुंभ यांची पाणी पातळी खालावली . त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधर बोर्डीकर यांनी केले.

## बचत गट उत्पादित वस्तू व मालाचे १८ मार्चपासून प्रदर्शन व विक्री प्रदर्शनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन - जिल्हा समन्वय अधिकारी बाळासाहेब झिंजाडे

**मोहन धारासूरकर**
**परभणी,/प्रतिनिधी-** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम),व जिल्हा कार्यालय, माविमच्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन व नवतेजस्विनी ट ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत लोकसंचलित संसाधन केंद्र, मार्फत स्वयंसहाय्यता महिला बचत गटाने तयार केलेल्या वस्तू व मालाचे जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्रीचे मंगळवारपासून आयोजन करण्यात आले .

हे प्रदर्शनाचे १८ ते २० मार्च २०२५ या तीन दिवसीय कालावधीत सिटी क्लब, परभणी येथे ठिक सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले . नवतेजस्विनी महोत्सव २०२५ मध्ये विविध बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू मालाचे स्टॉल, महिलांची आरोग्य तपासणी शिबीर, विविध परवाने शिबीर, उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्व लोकसंचलित साधन केंद्राचा सत्कार, महिला स्वयंसहायता बचत गटांना कर्ज वितरण व सन्मान माविम मित्र मंडळातील पुरुषांचा सन्मान सोहळा, शासकीय योजनाची माहिती, विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .

बुधवार, (दि.१९) रोजी माविम मित्र मंडळातील पुरुषांचा सन्मान सोहळा, विविध शासकीय योजनाची माहिती, चर्चासत्र, परिसंवाद , कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले . प्रदर्शनात वेगवेगळे संस्कृतिक कार्यक्रम, आरोग्य व पोषणाविषयी जनजागृती, होममिनिस्टर, महिलांच्या स्पर्धा इतर विविध कार्यक्रमांचे आयोजन आणि आरोग्य तपासणी शिबीर, विविध परवाने शिबीरांचे आयोजन करण्यात आले .

तर गुरुवार (दि.२०) रोजी प्रदर्शनात नव उद्योजक महिलांचे मनोगत, सन्मानपत्र वाटप व पुरस्कार वितरण आणि आरोग्य तपासणी शिबीर, विविध परवाने शिबिरांचे आयोजन करण्यात आले . या प्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या डाळी, गावरान मसाले, पापड, लोणचे, ज्वेलरी, पनीर, लोणी, दही, तूप, पाणीपुरी, भेळ, चाट भांडार, तृणधान्य, साड्या, महिलांनी तयार केलेल्या हस्तकलेच्या वस्तू, शोभेच्या वस्तू मातीची भांडी, लाकडी वस्तू, सेंद्रिय खाद्यपदार्थ व फळे भाजीपाला, बेकरीचे पदार्थ, उदबत्ती, मेणबत्ती रेडीमेट गारमेंट तसेच आणखीन बऱ्याच काही व उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध . तरी आपण जस्तीत जास्त महिलांनी योग्य हमी भावात मिळणारे वस्तू व मालाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समन्वय अधिकारी बाळासाहेब झिंजाडे यांनी केले .



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# औरंगजेबाची कबर हटविण्यासाठी बजरंग दल, विहिंपचे धरणे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मार्च**

छत्रपती संभाजीनगर येथे क्रूरकर्मा औरंगजेब याची कबर आहे. वास्तविक औरंगजेबाचा मृत्यू अहिल्यानगर येथे झाला परंतु त्याचे प्रेत काढून ते छत्रपती संभाजीनगर येथे पुरले आणि तिथे कबर करण्यात आली. छत्रपती संभाजी राजे यांना अनेक यातना देऊन त्यांची हत्या करण्यात आली. तसेच हिंदुंची मंदिरे उध्वस्त करणाऱ्या औरंगजेबाची कबर हटविण्यात यावी अन्यथा बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद तीव्र आंदोलन करेल असा इशारा देत सोमवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करीत क्रूरकर्मा औरंगजेबाची छत्रपती संभाजी नगर येथील कबर हटविण्याची मागणी केली. निवेदनात क्रूरकर्मा औरंगजेब याने शीख गुरू तेगबहादूर यांची क्रूरपणे हत्या केली. शीख गुरू गोविंदसिंग यांच्या दोन बाल साहेबजाद्यांना ते केवळ मुस्लीम धर्म स्विकारत नाहीत म्हणून जीवंत भिंतीत पुरले. धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांना अनेक यातना देऊन त्यांची क्रुरपणे हत्या केली. काशी विश्वेश्वराचे मंदिर फोडले, त्र्यंबकेश्वर मंदिर, जेजुरी गडावर हल्ले केले. मथुरेच्या मंदिराचा विध्वंस केला. सोरटी सोमनाथाचे मंदिर फोडले. हजारो हिंदूंच्या प्रेताच्या राशी गावाबाहेर रचून हिंदुंची क्रुर कत्तल केली. हिंदूंचे मोठ्या प्रमाणावर धर्मांतरण केले. अशा क्रूरकर्मा व आतातायी औरंगजेबाचे कुठलेही स्मारक व कबर स्वतंत्र भारत देशात असणे म्हणजे गुलामीचेच प्रतीक आहे. त्यामुळे ही कबर तत्काळ हटविण्यात यावी अन्यथा बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद तीव्र आंदोलन करीत बाबरीसारखी ही कबरही हटविण्याचा इशारा यावेळी कार्यकर्त्यांनी दिला आहे.

यावेळी बजरंग दलाचे संयोजक कैलाश श्रीनाथ, महेश बियाणी, एस बी अग्रवाल, राजेंद्र हलवाई, गोकुळ बंडाळे, अरूण कुमार, अंकुश हनवते, भोला शिखरे, माधव पऊळकर, शाम हातागळे, राम हराळ, शुभम श्रीवास्तव, अविनाश श्रीनाथ, गणेश सोळंके, आशिष कुरील, रमाकांत मिस्कीन, प्रदीप धडवाई, गोपाल उचाडे, गजानन गाढवे, गणेश नेमाडे, करण सुतारे, रितेश जाधव, शंतनू जाधव, निखील शिंदे, बालाजी पोते, रामेश्वर गांजरे, विजय शिंदे, विनोद गोरे, चेतन शिंदे, प्रवीण चव्हाण, नागेश देवके, शैलेश नांदेडकर, गणेश जाधव आदींची उपस्थिती होती.

# शिवरस्ता काढून देण्याच्या कारणावरून तलवारीने मारहाण

## आरोपींवर हद्दपारीचा प्रस्ताव दाखल करण्याची आ. पडळकरांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मार्च**

बळसोंड शिवारातील गारमाळ भागातील काही जणांनी शिवरस्ता काढून देण्याच्या कारणावरून वाद घालीत एकाला तलवारीने मारहाण करून जखमी केले तसेच त्यांच्या कुटुंबियांनाही मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी १८ जणांवर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, संजय ढाले रा बासंबा यांना बळसोंड शिवारातील गारमाळ भागातील काहीजणांनी थांबवून शिवरस्ता काढून देण्याच्या कारणावरून त्यांच्याशी वाद सुरू केला. या वादातून हाणामारीला सुरूवात झाली. या मारहाणीत संजय ढाले यांना तलवारीने डोक्यावर जीवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण केली. सदर घटनेची माहीती मिळाल्यानंतर संजय यांच्या कुटुंबियांनी घटनास्थही धाव घेतली असता हल्लेखोरांनी त्यांनाही लोखंडी रॉड, काठ्याने मारहाण करण्यात सुरूवात केली. या मारहाणीत संजय ढाले हे गंभीर जखमी झाले तसेच काही कुटुंबीय सुध्दा जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रूग्णालयात नेत असतांनाही अकोला बायपास रोडवर अमीर चाँद प्यारेवाले आणि सलीमलाला प्यारेवाले यांच्यासह इतर काहीजणांनी गाडी अडवून गाडीवर दगडफेक करून नुकसान केले. याप्रकरणी संजय माणिकराव ढाले यांच्या फिर्यादीवरून बासंबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून सदरील घटना हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्यामुळे गुन्हा ग्रामीण पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आला. या प्रकरणी अजीम कासीम प्यारेवाले, बिलाल प्यारेवाले, अयुब कासीम प्यारेवाले, रमजानलाल प्यारेवाले, कासीम हसन प्यारेवाले, सुभान चौधरी, मुस्ताक बीराम प्यारेवाले, अंसार बीराम प्यारेवाले, कलंदर प्यारेवाले, अमीर चाँद प्यारेवाले, सलीमलाला प्यारेवाले यांच्यासह इतर चार ते पाचजणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात आरोपींना अटक करण्यासाठी हिंगोली ग्रामीण, बासंबा पोलिसांची स्वतंत्र पथके स्थापन केली असून स्थानिक गुन्हे शाखेची पथकेही रवाना करण्यात आली आहेत. मारहाण करणाऱ्या आरोपींना लवकरच अटक केली जाईल अशी माहीती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिली आहे.

**आरोपींच्या हद्दपारीचा प्रस्ताव दाखल करण्याची आ. पडळकरांची विधानसभेत मागणी**

तहसीलदाराच्या आदेशानुसार मंडळ अधिकारी नाईक, सय्यद व इतर दोन कर्मचारी शिवेवरील रस्ता काढून देण्यासाठी आले होते. यावेळी आजीम प्यारेवाले, रमजान प्यारेवाले, सुभान चौधरी, मुश्ताक प्यारेवाले यांच्यासह इतर काही लोक तेथे आले. त्यांनी तलवारी, रॉड, काठ्याने मदन ढाले, प्रफुल्ल ढाले, वनीता ढाले, भारत ढाले यांना मारहाण केली या मारहाणील त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. जखमी झालेले सर्वजण नांदेड येथील संजीवनी हॉस्पीटलमध्ये उपचार घेत आहेत. या घटनेमुळे तालुक्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून या प्रकरणातील आरोपींवर गंभीर गुन्हे असून त्यांच्यावर हद्दपारीचा प्रस्ताव दाखल करण्यास पोलिस अधीक्षक हिंगोली यांना सूचना देण्याची मागणी विधानसभेत आ. गोपीचंद पडळकर यांनी केली आहे. तसेच शिवरस्ता खुला करण्यासाठी जिल्हा प्रशासनाला आदेश देण्याची मागणीही त्यांनी केली.

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षपदी रमेश सानप



हिंगोली- औंढा नागनाथ येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची दि.१७ मार्च रोजी बैठक पार पडली. बैठकीला माजी मंत्री जयप्रकाशजी दांडेगावकर आणि जिल्हाध्यक्ष दिलीपराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थां, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपरिषदा निवडणूका, विचारात घेऊन पक्ष संघटन बळकट करणे अशा महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा होऊन त्या दृष्टिकोनातून पक्षाची ताकद वाढविण्यासाठी विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यावर भर देण्यात येऊन पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायचे ठरवले. यावेळी औंढा तालुकाध्यक्षपदी रमेश सानप यांची निवड करण्यात आली. जयप्रकाश दांडेगावकर व जिल्हाध्यक्ष दिलीपराव चव्हाण यांच्या हस्ते रमेश सानप यांना हे निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले. यावेळी मुनीर पटेल, प्रा.गुलाब भोयर, अवधूत निळकंठे, फारुख भाई, आप्पराव आहेर, स्वप्नील मुळे, विठ्ठलराव गायकवाड, राजेश आघाव, प्रकाशराव गायकवाड, गणेशराव गायकवाड, किशोर राऊत, तुकाराम गायकवाड, प्रसाद गायकवाड, माणिकराव रेंगे, संतोष मोरगे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### हिंगोली पंचायत समितीच्या इमारतीची पाहणी



हिंगोली- येथील पंचायत समितीच्या नूतन इमारतीचे काम जवळपास पूर्ण झाले असून सुसज्ज अशी पंचायत समितीची इमारत उभारण्यात आली आली आहे. सोमवारी गटविकास अधिकारी गायकवाड यांनी या इमारतीची पाहणी केली. यावेळी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### हिंगोलीत हळदीला प्रतिक्विंटल ११ हजार भाव



हिंगोली- येथील संत नामदेव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोमवारी सुमारे ३ हजार क्विंटल हळदीची आवक झाली असून सकाळपासूनच शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या यार्डमध्ये वाहनाद्वारे हळद विक्रीसाठी आणली होती. दुपारी १२ वाजता हळदीचा लिलाव करण्यात आला. यावेळी नवीन हळदीला प्रतिक्विंटल ११ हजार तर जुनी हळद १२ हजार ५०० रूपये दराने विक्री होत आहे.

### २३ वाहन चालकांविरूध्द कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २३ वाहन चालकांविरूध्द कारवाई करीत त्यांचेकडून १९७५० रूपयांचा दंड वसूल केला आहे.



**हिंगोली- आरटीएस दक्षता व सनियंत्रण कक्षाचे उद्‌घाटन सोमवारी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

# औंढ्यातील व्यापारी, नागरिकांचे तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मार्च**

औंढा नागनाथ शहरातील व्यापारी व नागरिकांच्यावतीने तहसीलदार तथा नागनाथ देवस्थानचे अध्यक्ष हरीश गाडे यांना निवेदन देण्यात आले आहे.

सदरील निवेदनामध्ये सविस्तर वृत्त असे आहे की,मौजे औंढा नागनाथ येथील नागनाथ मंदीराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याला लागुन प्रदिप गंभिरे, सचिन बियाळे व रमेशसिंह ठाकुर यांचे बांधकाम चालु आहे. सदरील वांधकाम करण्यासाठी लागणारे सर्व साहित्य हे नागनाथ मंदीराकडेजाणाऱ्या मुख्य रस्त्याने ने-आण करत असतांना रस्ता अरूंद असल्यामुळे पुर्ण मार्केटमध्ये धुळ तसेच अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे पुर्ण मार्केटला खुप त्रास होत आहे. सदरील अडचणी व त्रास कमी करण्यासाठी त्यांचे चांधकाम होईपर्यंत तात्पुत्या स्वरूपात त्यांना नागनाथ मंदीराच्या पार्किंग मधून ये-जा करण्याची मुभा द्यावी आणि नागरीकांना होणारा त्रास कमी करावा. प्रदिप गंभिरे, सचिन बीयाळे व रमेशसिंह ठाकुर यांनी नागनाथ मंदीराच्या पार्किंग मधुन ये-जा चालु केली होती परंतु जाणीवपुर्वक राजकीय सूडबुध्दीने त्यांना नागनाथ मंदीराच्या पार्किंग मधुन ये-जा बंद करण्यासाठी ०५ मार्च २०२५ रोजी जे निवेदन दिले आहे. हे केवळ राजकीय षडयंत्र आहे. त्या निवेदनामुळे नागरीकास व मार्केट मधील व्यापाऱ्यास त्रास होईल. नागनाथ देवस्थानचे अध्यक्ष यांनी या निवेदनाचा विचार करून व्यापाऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेता सहकार्य करावे. अशी मागणी मुख्य बाजारपेठ मधील व्यापार व नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी औंढा नगरपंचायत एस पि कानकुटे, अनिल देव, सुजितसिंह ठाकूर, अनिल देशमुख, माजी सभापती राजेंद्र सांगळे, साहेबराव देशमुख, कपिल खंदारे, दिलीप राठोड, मनोज देशमुख, राहुल दंतवार, गणेश पाटील, संदीप गोबाडे, विष्णू पवार, श्रीराम राठी बालासाहेब शिंदे, बळीराम भोजे विक्की झांजरी, द्वारकादास सारडा बाळासाहेब ठाकूर, प्रदीप गंभीरे सचिन बियाळे, मनोज अग्रवाल चंद्रकांत भोजे, गजानन देशपांडे निलेश सारडा, गणेश कुरवाडे शशांक पाठक, प्रमोद अग्रवाल सुनील पुराणिक,गजानन वाखरकर माधव गोरे, राजू वाकुडे, साई गोरे खंडू सोनटक्के, संभाजी गायकवाड यांच्यासह व्यापारी व नागरिक निवेदन देतेवेळी उपस्थित होते.

# संच मान्यतेचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मार्च**




शिक्षण हक्क कायद्यातील कलम १९ व २५ मधील तरतुदीस विसंगत असा दि १५ मार्च २०२४ चा अन्यायकारक शासन निर्णय रद्द कराव या मागणीसह इतर मागण्यांसाठी दि १७ मार्च रोजी जिल्हा परिषदेसमोर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने धरणे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

या निर्णयानुसार सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षात विद्यार्थी पटसंख्येच्या आधारावर शिक्षकांची पदे नुकतीच निश्चित करण्यात आली आहे. शासन निर्णयाने निर्धारीत केल्यानुसार इयत्ता ६ ते ८ वीमध्ये २० किंवा २० पेक्षा कमी विद्यार्थी असल्यास शिक्षकाचे एकही पद मान्य केलेले नाही. तसेच प्राथमिक इयत्ता निहाय शिक्षक निर्धारण संबंधाने सुध्दा अत्यंत चुकीच्या पध्दतीने आणि शिक्षण हक्क कायद्यातील कलम १९ व २५ मधील तरतुदीस विसंगत अशा १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार संचमान्यता केली आहे. परिणामी राज्यात १४ हजारापेखा अधिक प्राथमिक शाळा प्रभावीत होत असून २० हजारापेक्षा अधिक शिक्षक या शाळांमधून अतिरिक्त होत आहेत. लहान गावातील शाळा बंद पडण्याची भिती असून या गावातील बालकांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. त्यामुळे अन्यायकारक शासन निर्णय रद्द करावा अशी मागणी करण्यात आली आहे. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष श्रीराम महाजन, सचिव शिवाजी अन्नमवार, विजय राठोड, शाम राऊत, पंडीत नागरगोजे यांच्यासह शिक्षकांनी सहभाग घेतला.

# आदर्शच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे कवी इंद्रजीत भालेराव यांच्याहस्ते उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मार्च**




येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन २०२४-२०२५ चे आयोजन करण्यात आले. सदरील स्नेहसंमेलनाचा उद्घाटन सोहळा दिनांक १७ मार्च २०२५ रोजी पार पडला. या उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा हे उपस्थित होते तर उद्धघाटक म्हणून महाराष्ट्रातील मराठीचे सुप्रसिद्ध ग्रामीण कवी प्रा. इंद्रजित भालेराव यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणेश चौधरी, सचिव रामचंद्र कयाल, सर्व पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य रमेशचंद्र चांडक, सदाशिवअप्पा सराफ, रमेशचंद्र मुंदडा, किशोरसेठ सोनी, अमृतलाल वर्मा, प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव, उपप्राचार्य प्रो. डॉ. संजीवकुमार नरवाडे, एमसीव्हीसी समन्वयक डॉ. संजय कयाल, स्नेहसंमेलन प्रभारी प्रा. डॉ. सोनलकुमार नगरकर, स्नेहसंमेलन सहप्रभारी प्रा. पंडित कु-हाडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन व नटराज प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्रा. धनंजय जोशी व संच यांच्या स्वागत गीताने करण्यात आले.

याप्रसंगी सचिव रामचंद्र कयाल यांनी मार्गदर्शन करताना आपल्या शैक्षणिक जीवनातील काही अमूल्य अशा आठवणी सांगत विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर मनोगत स्नेहसंमेलन प्रभारी प्रा.डॉ.सोनलकुमार नगरकर यांनी केले. यानंतर प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांनी मार्गदर्शन केले यावेळी मार्गदर्शन करताना वार्षिक स्नेहसंमेलनची परंपरा महाविद्यालयात सतत सुरू आहे. यानिमित्ताने अनेक नामवंत व्यक्ती स्नेहसंमेलनाला लाभले होते. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी शिस्तीमध्ये स्नेहसंमेलनाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोप करताना कमलकिशोर काबरा यांनी स्नेहसंमेलनाच्या आयोजनासाठी अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनात सहभागी व्हावे असा संदेश देऊन स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर तर आभार प्रदर्शन प्रा. पंडित कु-हाडे यांनी केले.

सदरील स्नेहसंमेलनाचे उद्धाटक मा. प्रा. इंद्रजित भालेराव हे आपल्या विविध कविता सादर करून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. यामध्ये बाप, राजमाता जिजाऊ, शेतकरी आत्महत्या इत्यादी कवितांचा समावेश होता. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये हास्याचा एकच कल्लोळ निर्माण झाला. तसेच व्याख्यानांमधून विद्यार्थ्यांना संबोधित करुन मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अद्वितीय मेजवानी ठरला आहे. यासोबतच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले. ज्यामध्ये देशभक्तीपर गीत, समूहगीत, समूह नृत्य, एकांकिका, गीतगायन, विनोद, मिमिक्री, शेलापागोटे, वैयक्तिक गीत, वैयक्तिक नृत्य, इत्यादी रंगारंग कार्यक्रमाचे भव्य दिव्य सादरीकरण झाले.

या कार्यक्रमाप्रसंगी कार्यालयीन अधीक्षक दिलीप दुबे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. तुकाराम हापगुंडे, स्स्टाफ सचिव प्रा. डॉ. सचिन हाटकर, सहसचिव प्रा. वसंत पडोळे, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्राचे नेतृत्व करावे : जिल्हाधिकारी कर्डिले

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१७ मार्च**

जिल्ह्यातील ८० टक्के नागरिक शेतीवर आधारीत अर्थव्यवस्थेशी जुळले आहेत. मात्र कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, जलसंधारण, कृषी यांत्रिकीकरण सर्वच क्षेत्रात आम्हाला सुधारण्यास वाव आहे. त्यामुळे ज्यांनी सेंद्रियशेतीपासून शेतीवर आधारीत अर्थव्यवस्थेत प्रगती केली आहे त्या प्रथीतयश शेतकऱ्यांनी नांदेडच्या कृषीक्षेत्राचे नेतृत्व करावे. कृषी विभाग त्यांना पाठबळ देईल, अशा आश्वासक शब्दात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी प्रगतीशील शेतकऱ्यांना जिल्ह्याच्या विकासात पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

जिल्हाधिकारी नांदेड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक आत्मा आणि नांदेड येथील रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा कृषी व धान्य महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान येथे १७ व १८ मार्च दोन दिवस हा महोत्सव सुरू असणार आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते या कृषी, माती, शेती व यासंदर्भातील तंत्रज्ञानाला जोडल्या गेलेल्या या कृषी महोत्सवाचे थाटात उद्घाटन झाले. यावेळी २९ वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या यशस्वी शेतकऱ्यांचा त्यांच्या हस्ते सत्कार झाला. या शेतकऱ्यांनी कृषीक्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोग करून अवघ्या काही गुंठे शेतामध्ये लक्षावधीचे उत्पादन घेतले आहे. या सर्व शेतकऱ्यांनी केलेले प्रयोग लोकांपर्यंत पोहोचावे व त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी बोलतांना जिल्हाधिकाऱ्यांनी काही मोजकी उदाहरणे दिली. ते म्हणाले अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये जितके दुध उत्पादन होते तेवढे उत्पादन आपल्या अनेक जिल्ह्यांचे मिळून होत नाही. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, समूहशेती, आयात-निर्यात निगडीत शेती यासंदर्भात अनेक चांगले प्रयोग जिल्ह्यात झाले पाहिजेत. त्यामुळे या दोन दिवसांमध्ये याठिकाणावरून ज्ञान घेऊन जा. त्यानंतर त्याबाबतीत प्रयोग करा. कृषीक्षेत्र प्रयोगशील लोकांना भरभरून परतफेड करणारे क्षेत्र आहे.

**कर्मचारी-नागरिकांनी भेट द्यावी**

यावेळी त्यांनी नांदेड महानगरात राहणाऱ्या नागरिकांना तसेच शासकीय कर्मचाऱ्यांनी देखील या जिल्हा कृषी व धान्य महोत्सवाला भेट देण्याचे आवाहन केले. सेंद्रिय शेतीमध्ये तयार झालेले धान्य तसेच भाजीपाला व विविध वस्तू या ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध आहेत. नागरिकांनी आवर्जून नवीन मोंढा येथील महोत्सवाला भेट द्यावी व मोठ्याप्रमाणात खरेदी करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

**२९ प्रगतिशील शेतकऱ्यांचा सत्कार**

आज जिल्हा कृषी व धान्य महोत्सवामध्ये २९ प्रगतीशील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये नांदुसा येथील खिरबाजी नागोराव कंगारे, भोसी येथील नंदकिशोर दिगांबर गायकवाड, दापशेड येथील विश्वनाथ गोविंदराव होळगे, सायाळ येथील रत्नाकर ढगे, मालेगाव येथील भगवान इंगोले, धारापूर येथील सदानंद ढगे, सोनवाडी येथील वनिता श्रीराम फोले, रेणापूर येथील सुनिता अशोक कावळे, धामदरी येथील गंगाबाई शामराव कदम, हिमायतनगर येथील गजानन प्रकाश तुप्तेवार, बारड येथील बालाजी मारोती उपवार, लगळूद येथील योगेश पोताजी टाकळे, कामठा बु येथील महानंदा केशवराव कल्याणकर, बोधडी येथील अभिजीत प्रभाकर जमादार, बनचिंचोली येथील बळवंत देवराव पौळ, सुजनवाडी येथील कृष्णा माधवराव भालेराव, हुंडा येथील श्रीधर शंकर गुंजकर, बितनाळ येथील गंगाधार दत्ताराम मुकदमे, नायगाव तालुक्यातील दिलीप शेळगावे, मांजरम येथील गणपती आनंदराव शिवारेड्डी, कासराळी येथील बसवंत शंकरराव कसराळीकर, बाळापूर येथील रविंद्र मलकन्ना पोतगंटीवार, मनाठा येथील संजय पांडुरंग सुर्यवंशी, साप्ती येथील कबिरदास कदम, कलंबर येथील मोहन विठ्ठल सोरगे, मनाठा येथील संतोष पांडुरंग सुर्यवंशी, चैनपूर येथील माधव शंकरराव पाटील, कुडली येथील सुनिल नामदेव चिमणपाडे, मालेगाव येथील अमोल बालाजी सावंत या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार यांनी यावेळी या प्रगतीशील शेतकऱ्यांच्या कार्यकर्तुत्वाला जाणून घेतले.

**एकदा अवश्य भेट द्या**

जिल्हा कृषी व धान्य महोत्सवात उत्पादक ते ग्राहक थेट विक्री करण्यात येते. याठिकाणी स्थानिक गुळ, भाजीपाला, विविध दाळी, फळे, ऊस, ज्यूस, महिला बचतगटांचे स्टॉल, वनऔषधी, लाकडी घाणा तेल याशिवाय सेंद्रीय शेतीत पिकविण्यात आलेली गहू, ज्वारी, तूर, मुग, उडीद, हरभरा दाळ, मध, डिंक, सेंद्रिय टरबूज, खरबूज याशिवाय नित्य उपयोगी जीवनावश्यक वस्तूंचे ८२ स्टॉल्स लावण्यात आले आहेत. शेतकऱ्यांचे असणारे हे स्टॉल विक्रीसाठी नांदेडकरांची वाट बघत असल्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

**शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद**

दुसऱ्या सत्रामध्ये याच व्यासपीठावरुन शेतीविषयक मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. आनंद गोरे यांनी सेंद्रिय शेती आणि नैसर्गिक शेती व पीक व्यवस्थापन, डॉ. पी. एच. गौरखेडे यांनी सेंद्रिय निविष्ठा निर्मिती, श्री. हर्षल जैन यांनी सेंद्रिय शेती प्रमाणिकरण कार्यपध्दती, सुदाम शिरोळे यांनी कार्बन क्रेडिट संकल्पना व भविष्यातील संधी, दिनकर पाटील यांनी मधूमक्षिका पालन काळाची गरज, डॉ. अनंत लाड यांनी हवामान बदल आणि एकात्मिक किड व्यवस्थापन याविषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तंत्र अधिकारी जाधव के एम , प्रमोद गायके ,संदीप स्वामी, कृषी अधिकारी सुनील सानप, कृषी पर्यवेक्षक लक्ष्मण हांडे, तंत्र व्यवस्थापक सोहेल सय्यद आदींनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त



### तिथीनुसार शिवजन्मोत्सव उत्साहात

**नवीन नांदेड**-सडको येथे तिथीनुसार शिवजन्मोत्सव शिवसेना उबाठा गटाचे शहर प्रमुख जितुसिंग टाक यांच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दिनांक १७ मार्च रोजी सिडको हाडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास विधीवत दुग्ध अभिषेक करण्यात आला. सिडको येथे तिथीनुसार शिवजन्मोत्सव दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात दिनांक १७ मार्च रोजी साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सिडको शिवसेना ऊबाठा गटाचे दक्षिण जिल्हाप्रमुख भुजंगराव पाटील डक, उत्तर जिल्हाप्रमुख बबन बार्से, प्रकाश मारावार यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको शहरप्रमुख जितुसिंग टाक यांच्या नेतृत्वाखाली सिडको हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांचे विधिवत पूजापाठ करून दुग्ध अभिषेक करण्यात आला. व लागलीच दुपारी २ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी दक्षिणचे जिल्हाप्रमुख भुजंगराव पाटील डक, उतरचे जिल्हा प्रमुख बबन बारसे,प्रकाश मारावार, महेश खेडकर हे उपस्थित राहून यांनी आपले मनोगत व्यक्त केले.तसेच शिवसेना शहर प्रमुख जितू सिंग टाक, कामगार जिल्हा प्रमुख ब्रिजलाल उगवे , माजी शहरप्रमुख निवृत्ती जिंकलवाड, माजी शहर प्रमुख साहेबराव मामीलवाड, शहर संघटक प्रमोद मेड, विभाग प्रमुख विष्णू कदम, उपशहर प्रमुख गौरव दरबास्तवार, उपशहर प्रमुख संदीप जिल्लेवाड यासह गणेश जयस्वाल, सुहास साबणे, तुकाराम पांचाळ, दिगंबर सुरनर, ड.अरुण रिसनगावकर, संतोष आष्टीकर, आनंदा वाघमारे, मनोज यादव ,आनंदा गंगातीरे, निळकंठ काळे, अर्जुन ठाकूर, किशोर ठाकूर, श्रीनिवास सारले, महिला आघाडीच्या निकिता शहापूरवाड, यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवजन्मोत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

### बेंबरा येथे अखंड हरिनाम सप्ताह

**हणेगाव**-बेंबरा येथे संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळा (बीज) त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव (३७५) वर्षे निमीत्य हनुमान मंदिर बेंबरा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दिनांक १० मार्च सोमवार ते दिनांक १७ मार्च सोमवार असे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात ह.भ.प.श्री श्रावण महाराज बेंबरा,ह.भ.प.बाबु महाराज बेंबरा,ह.भ.प रमेश रेड्डी महाराज मानूर (के),ह.भ.प. बलभीम महाराज येडुर (खु.), ह.भ.प.संतोष महाराज बालूर, ह.भ.प.विश्वंभर म.साबणे, श्री तुकाराम माणिक महाराज बेंबरा (दुपारी संत तुकाराम बीज किर्तन), रामचंद्र महाराज बेंबरा व रघुनाथ वट्टे(गुरुजी) हल्लाळीकर यांचे काल्याचे किर्तन झाले आहे. बेंबरा व हाणेगाव परिसरातील भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा अशी विनंती संयोजक तुकाराम माणिक महाराज बेंबरा व आयोजक विश्वंभर तुकाराम साबने यांनी केली होती तर सोमवार रोजी हरिनाम सप्ताहचं (काला) अर्थातच (शेवट) झाला असुन या रोजी असंख्य भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतले आहेत.

### देगलूरमधील अवैध रेती उत्खनन

**नांदेड**-देगलूर तालुक्यातील मौजे शेवाळा, शेकापूर, सांगवी उमर व परिसरातून होत असलेली अवैध रेती तस्करी बंद करण्याची



तक्रार देऊन रेती माफियांना सहकार्य करणारे मंडळ अधिकारी व तलाठ्यांवर कारवाई करण्याची मागणी का केली म्हणून रेती तस्कर शेख जुनेद याने मनसे तालुकाध्यक्ष मन्मथ परबते यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी विशेष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्याकडे केली आहे. देगलूर तालूक्यातील मौजे शेवाळा, शेकापूर व सांगवी उमर येथील नदीपात्रातून रात्री दहा ते सकाळी सात वाजेपर्यंत रेती उत्खनन व पुष्पा २ स्टाईल चोरट्या मार्गाने वाहतूक केली जात असल्याची तक्रार मनसे तालुकाध्यक्ष परबते यांनी केली होती. अवैध रेती तस्करीची तक्रार झाल्याने रेती माफीयांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे मनसे तालुकाध्यक्ष मन्मथ परबते यांना रेती तस्करी करणारा शेख जुनेद याने भ्रमणध्वनी क्रमांक- ९९ २२ ७७ ३५ ७६ वरून फोन करीत अवैध रेती तस्करीची तक्रार का दाखल केली म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली आहे. याप्रकरणी कडक कायदेशीर कारवाई करून पोलीस संरक्षणाची मागणी विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्याकडे केली आहे. महसूल प्रशासनाचे अवैध गौण खनिज तपासणी नाका खानापूर फाटा येथे कार्यरत मंडळ अधिकारी बालाजी पुष्पलवार गौण खनिज लिपीक हनुमंत नकुलवार व एका पोलीस कर्मचाऱ्यांचे रेतीमाफियांना सहकार्य असून त्यांच्या जोरावर शेख जुनेद याने परबते यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या तालुक्याध्यक्षांना जिवे मारण्याची धमकी दिल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खानापूर फाटा येथे कार्यरत गौण खनिज तपासणी पथकातील मंडळ अधिकारी बालाजी पुष्पलवार यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करीत त्यांनी स्वतःचे दोन हायवा व बोलेरो पिकअप वाहन लावून आपल्या माणसांच्या माध्यमातून स्वतः रेती तस्करी करीत असल्याचा तक्रार राजेश अंगदराव गंगनर यांनी देगलूर तहसीलदार भरत सूर्यवंशी यांच्याकडे केली असून त्यांच्या संपत्तीची चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करीत बडतर्फ करण्याची मागणी केली आहे.

# यादव अहीर मंडळ नांदेड येथे भव्य होळी मिलन सोहळा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१७ मार्च**



श्री क्षत्रिय समाज (रजि. एफ-११) राजपूत नांदेड आणि यादव अहीर मंडळ तर्फे आयोजित भव्य होळी मिलन सोहळा राधाकृष्ण मंदिर परिसरात अत्यंत उत्साहात आणि आनंदात संपन्न झाला. या सोहळ्यात राम प्रताप भजन मंडळाने राजपूत समाज बांधवांचे पारंपरिक होळीच्या फागाने आणि भक्तिमय गीतांनी भव्य स्वागत केले. भजनाच्या सुरावटींनी वातावरण भक्तिमय झाले आणि उपस्थितांनी रंगांची उधळण करून होळीच्या रंगात रंगून गेले.

या कार्यक्रमात यादव अहीर मंडळाच्या सदस्यांनी विशेष सहभाग नोंदवत राजपूत समाज बांधवांचा सन्मान केला आणि त्यांना होळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यादव अहीर मंडळाने पुष्पवर्षावाने राजपूत समाजाचे स्वागत केले. या प्रसंगी दोन्ही समाजातील बांधवांनी एकत्र येऊन बंधुभाव आणि एकतेचे दर्शन घडवले.

समारंभात राजपूत समाजाच्या सदस्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून होळीचे फाग गात नृत्य केले. ढोल-ताशांच्या गजरात आणि रंगांच्या वर्षावात संपूर्ण परिसर आनंदमय झाला. बाल गोपाल ही मोठ्या संख्येने सहभाग घेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि पारंपरिक नृत्य सादर केले.

श्री क्षत्रिय समाज (रजि. एफ-११) राजपूत नांदेडचे अध्यक्ष यांनी आपल्या भाषणात सांगितले की, होळीचा सण हा आपल्याला एकतेचा संदेश देतो. या सणाद्वारे समाजात प्रेम आणि सौहार्दाची भावना अधिक दृढ होते. या सोहळ्यात विविध समाजातील बांधवांनी एकत्र येऊन जी एकता आणि बंधुत्व दाखवले ते कौतुकास्पद आहे.

या सोहळ्याला भारत भूषण यादव, गगन यादव, तुलजाराम पैलवान, राजू बटाऊवाले, गणेशलाल मंडले, गोपाल फतेहलष्करी,मनोज मंडले ईश्वर बटाऊवाले डॉ. कैलाश यादव गोकुल यादव, शुभम यादव, भावेश यादव, तथा नांदेडमधील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती, समाजातील मान्यवर आणि युवा वर्गाने मोठ्या प्रमाणात हजेरी लावली. सोहळ्यानंतर उपस्थितांसाठी पारंपरिक मिठाई आणि अल्पोपाहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री यादव युवक संघ, यादव अहीर मंडळ च्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साहात पार पडला. होळी मिलन सोहळ्याने राजपूत व यादव समाजातील एकता आणि सांस्कृतिक वारसा पुन्हा एकदा अधोरेखित केला.

# अर्धापूर तालुक्यात अवैध रेती व मुरूम माफियांचा राज

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१७ मार्च**

नांदेड जिल्हा हा अलर्ट मोडवर असून सुद्धा अर्धापूर तालुक्यात अवैध रेती व मुरूमाची भरमसाठ वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे. तर अनेक ठिकाणी गुत्तेदारांनी काम होण्याअगोदर स्टॉक रेती व मुरुमाचे ढिगारे जमविले आहे. सदरील रेती व मुरूम ढिगाऱ्यांची चौकशी करा अशा तक्रारी तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्याकडे राजकीय सामाजिक कार्यकर्त्यांच्या असून सुद्धा याकडे मात्र अर्धापूर महसूल विभाग व पोलीस प्रशासन गप्प का. असाही प्रश्न जनतेत निर्माण झाला आहे. या अगोदर अनेक वेळा राजकीय कार्यकर्त्यांनी निवेदने व तक्रारी करून सुद्धा सदरील अवैध रेती व मुरूमाची कोणतीही विभागाने चौकशी केलेली नसल्याचे बोलले जात आहे. तर महसूल विभाग व अवैध रेती व मुरूम वाल्यांची मिली भगत असल्याचे समोर येत आहे. यामध्ये पोलीस प्रशासन सुद्धा या बाबीकडे लक्ष का घालत नाही. असाही प्रश्न जनतेत निर्माण होत आहे. एकीकडे नांदेड जिल्हा अलर्ट मोडवर असून सुद्धा जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली अनेक ठिकाणी धाडी टाकून वाळू माफिया विरुद्ध मोठमोठ्या कारवाया होत असल्याचे वर्तमानपत्रातून दिसून येत आहे. परंतु अर्धापूर तालुक्यात रेती व मुरूम माफिया विरुद्ध कोणतीही कारवाई होत नसल्याचे जनतेत बोलल्या जात आहे. खेड्यापाड्यांमध्ये अनेक ठिकाणी रेतीचे ढिगारे मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. तर ही रेती येथे कुठून याची प्रशासनाला सर्व माहिती असताना सुद्धा प्रशासन गप्प का असाही सवाल तालुक्यातील जनतेत निर्माण होत आहे. महसूल प्रशासन पोलीस प्रशासन अवैध रेती व मुरूम यांची मिली भगत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. असे तालुक्यातील जनतेतून म्हटल्या जात आहे जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासन अर्धापुर तालुक्यातील अवैध रेती व मुरूम वाल्यांना चाप बसणार का? असाही प्रश्न उपस्थितीत होत आहे.



**छत्रपती संभाजी नगर येथे असलेली कुरकर्मा औरंगजेब याची समाधी हटवावी अशी मागणी विश्व हिंदू परिषदेच्या वतीने करण्यात आली.**

# महसूल आयुक्तालय नांदेड येथेच स्थापन करा- सुनील सोनुले

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.१७ मार्च**

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या महसूल आयुक्तालयाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावून आयुक्तालय नांदेड येथेच स्थापन करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कार्यकारणी सदस्य सुनील हरिहरराव सोनुले यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पाठवलेल्या निवेदनात सोनुले यांनी म्हटले आहे की, नांदेड जिल्हा हा मराठवाड्यात सर्वाधिक १६ तालुके असलेला जिल्हा असून जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १०,५२८ चौ. किमी आहे.नांदेड येथे महसूल आयुक्तालय स्थापन करण्याचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे.ही बाब लक्षात घेता गत महिण्यापुर्वी आपण नांदेड दौऱ्यात आयुक्तालयाच्या प्रश्न निकाली काढण्याबाबत वक्तव्य केले होते याची आठवण सोनुले यांनी निवेदनात करून दिली आहे. नांदेड



जिल्ह्यात १६ तालुक्यात ८० महसूल मंडळे असून ४५७ तलाठी सज्ज होते.पुनर्रचनेनंतर महसूल मंडळाच्या संखेत १४ ने वाढ झाली असून एकूण ९३ महसूल मंडळे व ५४१ तलाठी सज्जे झाले आहेत.

कामाचा वाढता आलेख पाहता,इतर जिल्ह्यांना सोयीस्कर होईल याही दृष्टीने तसेच भौगोलिक दृष्टीने आयुक्तालय नांदेड येथे झाले पाहिजे अशी आमची आग्रहाची मागणी असल्याचे निवेदनात त्यांनी स्पष्ट केले.

# नरसी सेवा सोसायटीवर आपलं पॅनलचा ६ जागेवर तर गांवकरी विकास पॅनलचा ७ जागेवर विजय

**तभा वृतसेवा**
**नायगांव, दि.१७ मार्च**

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून असले ल्या नरसी येथील सेवा सहकारी सोसायटीची निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रिया दि.१६ मार्च रोज रविवारी सकाळ पासून सुरुवात झाली असून. मतमोजणी लगेचच सायंकाळी ५ पासुन सुरुवात झाली. यावेळी श्रावण भिलवंडे यांनी एकाकी निवडणूक लढवित यांनी आपल्या आपलं पॅनलला सहा जागा मिळविल्या तर गांवकरी पॅनलने सात जागेवर विजय संपादन केला आहे.

नायगांव तालुक्यातील ग्रामीण भागा तील तेरा सदस्य संख्या असलेली सर्वात मोठी नरसी येथील सेवा सहकारी सोसायटी असुन. येथील सोसायटीवर मागील गेल्या काही गत काळापासून एक हाती सत्ता प्रस्थापित केली होती. परंतु येथील सेवा सहकारी सोसायटीची आजची निवडणूक ही उद्याची ग्रामपंचायती ची नांदी ठरेल या अनुषंगाने राज्यातील विविध राजकीय पक्षातील पदाधिकारी हे गाव पातळीवरील हित लक्षात घेत गावाच्या विकासाची धरु या भावनेतून गांवकरी विकास पॅनल माध्यमातून अनेक वर्षापासून पासुन येथील सोसायटीवरील सत्तेची परंपरा मोडीत काढण्याच्या दृष्टीने माजी जिल्हा परिषद सदस्य माणिक लोहगावे व शिवसेना तालुका प्रमुख रविंद्र भिलवंडे, मोहनराव भिलवंडे यांच्या नेतृत्वाखाली गावकरी विकास पॅनल च्या माध्यमातून प्रचाराची व्यूहरचना राबवित सर्व सोसायटीतील सभासदांना विकासा ची आश्वासने देत प्रचार यंत्रणा राबवित येथील सोसायटी च्या निवडणुक लढवित दि.१६ मार्च २०२५ रोजी रोज रविवारी मतदानाची प्रक्रिया पार पडली. यावेळी ४४० सभासदापैकी ३८८ सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. व लगेचच सायंकाळी ५ वा. पासून मोजणीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. सायंकाळी आठ वाजेच्या सर्व तेरा ही जागेचे निकाल हाती आले.यावेळी श्रावण भिलवंडे यांच्या आपलं पॅनल ने सहा जागा मिळविल्या तर गांवकरी विकास पॅनलने सात जागेवर विजय मिळविला. तर या मतमोजणी प्रक्रिये वेळी कुठला अनुचित प्रकार घडू नये यासाठी रामतीर्थ चे साह्यक पोलीस निरीक्षक श्रीधर भागवत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पि एस आय शिवाजी नरवाडे यांच्या नेतृत्वाखाली नरसी बिटचे जमा दार सुर्यवंशी सह,अन्य पोलीस कर्मचार्याचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# मेंदू विकारांसाठी वरदान ठरलेला आरोग्य शिबिर २० मार्च पासून

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१७ मार्च**



येथील राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्याने व जयवकील फाऊंडेशन, बीजे वाडिया चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई, कमल उडवाडिया फाऊंडेशन, एनएच-एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई, अन्नम, एओसीएन इंडिया, यांच्या संयुक्त विद्यमाने गत १४ वर्षापासून मेंदूचे विकार असणाऱ्या मुला-मुलींसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येते. या शिबिराचा हजारो रुग्णांना फायदा झाला असून हे शिबिर या रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. या वर्षी २७ वे शिबिर गुरुवार दि. २० मार्च पासून शहराच्या मगनपुरा नवा मोंढा येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात आयोजित करण्यात आले असल्याची माहिती राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष कमल कोठारी, सचिव प्रकाश मालपाणी सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज व शाळेचे मुख्याध्यापक नितिन निर्मल यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली आहे.

या वर्षी शिबिराचे हे पंधरावे वर्ष असून हे सत्ताविसावे शिबिर गुरुवार दि.२० ते २२ मार्च या कालावधीत मगनपुरा, नवा मोंढा येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात डॉ. अनैता हेगडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात त्यांची तज्ञ डॉक्टरांची टिम रुग्णावर उपचार करणार आहे. आत्तापर्यंतच्या सव्वीस आरोग्य शिबिरात हजारो रुग्णांवर उपचार करण्यात आले. याचा तब्बल ७ हजारापेक्षा अधिक रुग्णांना लाभ झाला आहे. नेत्रशस्त्रक्रियेमुळे दृष्टिहीन असलेल्या रुग्णांना दृष्टी मिळाली तर हाडांच्या शस्त्रक्रियेनंतर उभे राहण्यास असमर्थ असणाऱ्या रुग्णांना आता चालता येऊ लागले आहे. अनेक रुग्णांचे चालताना तोल जाणे, फिट्स येणे व ऑटीझम अशा मेंदूशी संबंधित आजारातून आरोग्य शिबिरात घेतलेल्या सातत्याने उपचारामुळे बहुतांश जणांनी आजारावर मात केली आहे तर अनेक जन उपचाराने आजारातून बरे होणार आहेत. हे आरोग्य शिबिर मेंदूचे विकार असणाऱ्या मुला-मुलींसाठी वरदान ठरले आहे. या शिबिरात उपचार घेण्यासाठी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगाना येथील राज्यातूनही मोठ्या संख्येने रुग्ण येत आहेत. प्रतिआरोग्य शिबिरात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या वतीने निवास व जेवणाची व्यवस्था करण्यात येते. आदिवासी व दुर्गम असलेल्या किनवट तालुक्यातील रुग्णांकरिता दि. २० व २१ मार्च रोजी प्रथम येणाऱ्या १५ नोंदणीकृत रुग्णांची मोफत वाहतुकीची व्यवस्था साने गुरुजी रुग्णालयाच्या वतीने करण्यात आली असल्याची माहिती प्रसिद्ध सर्जन डॉ. अशोक बेलखोडे यांनी दिली आहे. या शिबिरात नेत्र तपासणीही करण्यात येणार असून आवश्यक असणाऱ्यांना लेन्सकार्ट कंपनीच्या वतीने चष्म्याचे वितरण करण्यात येणार आहे.

प्रतिवर्षाच्या शिबिराप्रमाणे या वेळीही रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये यासाठी संस्था पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शन व मुख्याध्यापक नितीन निर्मल यांच्या नेतृत्वात आर. आर. मालपाणी मतिमंद व श्रीरामप्रताप मालपाणी मूकबधिर विद्यालयातील कर्मचारी जय्यत तयारी करीत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली आहे.

### नविन रुग्णांनी त्वरित नोंदणी करावी

नवीन रुग्णांसाठी पूर्व नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी नवीन रुग्णांनी आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालय, मगनपुरा नवा मोंढा नांदेड येथे प्रत्यक्ष जाऊन नोंदणी करावी तसेच शाळेत येणे शक्य नसणाऱ्या बाहेरगावच्या रुग्णांनी ८२०८११४८३२, ९०६७३७७५२० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.